Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

श्री सद्‌गुरु बाबाजी

चैतन्य महाराज



प्रा. वामनराव ओतूरकर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



प्रा. वामनराव ओतूरकर

माजी प्राचार्य :
लक्ष्मीबाई शिंदे हायस्कूल,
अरण्येश्वर, पुणे - ४११ ००९.
अध्यक्ष :
महाराष्ट्र भूगोल अध्यापक महामंडळ, पुणे
संस्थापक व कार्याध्यक्ष :
नवमहाराष्ट्र शिक्षण संस्था,
धवकवडी, पुणे - ४११ ०४३
अध्यक्ष :
ज्येष्ठ नागरिक संघ, धनकवडी, पुणे - ४३
संपादक :
भूगोल शिक्षक, त्रैमासिक, पुणे
अध्यक्ष :
चैतन्य मित्र मंडळ, (ओतूर) पुणे
कार्यकारिणी सदस्य :
पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे
सल्लागार :
राजर्षि शाहू सहकारी बँक, पुणे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



सद्गुरु बाबाजी चैतन्याची वारुळ सद्दश्य दिसणारी संजीवन समाधी.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सद्‌गुरु बाबाजी चैतन्य

(संक्षिप्त चरित्र आणि उपदेश)

संत-वाणी - रवि-रश्मि

संतवाणी - रवि रश्मि विमलका जब जगतमें होता विस्तार ।
'समता' 'प्रेम' ज्ञानका तब होता शुभशीतल शुभ्र प्रचार ॥
'सत्य' अहिंसाकी आभा उज्ज्वलसे सुख पाता संसार ।
'भक्ति', 'त्याग', 'शुचि', 'शान्ति' ज्योतिसे मिटता अघ-तम हाहाकार ॥१॥

लेखक

प्रा. वामनराव ओतूरकर

प्रकाशक

ओतूरकर प्रकाशन

१६, प्रतिभानगर, धनकवडी, पुणे-४३

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रकाशक
सौ. प्रमिला वामनराव ओतूरकर
१६ प्रतिभानगर, धनकवडी
पुणे ४११ ०४३
दूरध्वनी - ५७२२१३

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

प्रथमावृत्ती :
अक्षय तृतीया
दि. ६ मे २०००

मुखपृष्ठ :
संदीप कुलकर्णी पुणे.

मुद्रक :
आशू प्रिंटर्स,
धनकवडी, पुणे ४३

टाइपसेटिंग :
शेवाळे टाइपसेटिंग सर्व्हिसेस
६४४ अ, बुधवार पेठ, पुणे २

किंमत ३० रुपये

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मनोगत

संत शिरोमणी तुकाराममहाराजांचे गुरु बावाजी चैतन्य उर्फ केशव चैतन्य यांचे चरित्र लिहून प्रसिद्ध करावे असे अनेक दिवस माझ्या मनात घोळत होते. त्यामुळे ग्रामस्थांना व महाराष्ट्रातील असंख्य भक्तजनांना चैतन्यस्वामींचे चरित्र समजेल. त्याचप्रमाणे त्यांच्या संदर्भात असलेल्या इतिहासातील काही नोंदींचे ज्ञान होईल यासाठी मी 'इतिहास संशोधन मंडळ, पुणे' येथे ग्रंथालयात जाऊन काही ग्रंथ, लेख, पत्रे यांची माहिती मिळविली. ओतूरमध्ये तुकाराममहाराज अनुग्रहसमयी ज्या जानू तेल्याच्या घरी उतरले होते ती बखळ झालेली जागा पाहिली. चैतन्य विजय ग्रंथात 'राघव चैतन्य व केशव चैतन्य' कल्याण कलबुर्ग्यास राहिल्याचा उल्लेख असल्यामुळे मी हल्लीच्या गुलबर्गा येथे प्रत्यक्ष जाऊन मशिदीमध्ये असलेले 'राघव दराज व केशव दराज (दर्गा) ही जतन केलेली स्मारके पाहून आलो आहे. तसेच आळंद गुंजोटी व मान्यहाळ या गावांना भेटी देऊन माहिती संग्रहीत केली आहे.

खरे पाहता स्वामींच्या माहितीची ऐतिहासिक साधने फारच कमी आहेत असे चरित्र लिहिताना आढळून आले आहे. तरीसुद्धा सदर पुस्तकात सद्गुरु बाबाजी चैतन्य उर्फ केशव चैतन्य चरित्र, गुरु व सद्गुरु, गुरुकृपा, सद्गुरु कृपेचे अभंग, कवित्वस्फूर्ति, तुकोबारायांची गुरुपरंपरा, स्वामींची यादवबाबांवर कृपादृष्टी, ऐतिहासिक कागदपत्रे, लेखांक, आरत्या इत्यादी प्रकरणे दिली आहेत. त्याचप्रमाणे सदर पुस्तक सचित्र करण्याचा प्रयत्न केला आहे.

श्री बाबाजी चैतन्य यांच्या चरित्रातील सविस्तर घटनांचा फारसा वृत्तांत आढळत नसल्याने व माझ्यासारखा मनुष्य या विषयातील अधिकारी व्यक्ती नसल्याने त्यांच्या चरित्राचा सखोल अर्थ लावू शकत नाही. तरीपण ब्रह्मज्ञानाविषयी भक्तजनांमध्ये गोडी निर्माण करण्यासाठी हे पुस्तक साधन म्हणून निश्चितपणे उपयोगी पडेल व सामान्य वाचक व विद्यार्थीवर्गासही ते आवडेल असे वाटते. चैतन्यस्वामी तुकोबारायांचे सद्गुरु आहेत व उभा महाराष्ट्र ज्ञानोबा-तुकोबांचा भक्तगण आहे. म्हणून माझीही श्रीचैतन्यस्वामींवर अपार श्रद्धा आहे. या श्रद्धेपायीच पुस्तक लेखनाचा अवघड प्रपंच मी केला आहे. आपण भक्तिभावाने या 'सद्गुरु बाबाजी चैतन्य' पुस्तकाचे वाचन केल्यास त्याची मधुर फळे आपणास निश्चितपणे चाखावयास मिळतील असा विश्वास वाटतो.

सदर पुस्तक तयार करताना आशू प्रिंटर्सचे श्री. उल्हास पाटकर, त्याचप्रमाणे चंद्रकांत सीताराम आवटी (कांचन फोटो स्टुडिओ) ओतूर, पन्हाळे बंधू व मा. महादेवराव भाटे, विलासराव तांबे यांनी फोटो वगैरे देऊन बहुमोल सहकार्य केले. मी त्यांचा आभारी आहे.

प्रा. वामनराव ओतूरकर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अनुक्रमणिका

प्रकरण नं.	प्रकरणाचे नाव	पृष्ठ क्र.
१)	सद्‌गुरु बाबाजी चैतन्य संक्षिप्त चरित्र	७
२)	स्वामींची यादव बाबांवर कृपादृष्टी	२१
३)	गुरु व सद्‌गुरु	२३
४)	गुरुकृपा व कवित्व स्फूर्ती	३०
५)	गुरुकृपेचे अभंग	३२
६)	संतशिरोमणी तुकोबांची गुरुपरंपरा	३३
७)	आजचे प्रगतिपथावरील ओतूर	३५
८)	चैतन्य स्वामींबद्दलचे ऐतिहासिक कागदपत्रांचे पुरावे	३८
९)	आरत्या	४४

चित्रे :

चैतन्य मंदिर,

समाधी-चित्र

कपर्दिकेश्वर मंदिर

शंकराच्या देवळातील तांदळाच्या पिंडी

मुखपृष्ठावर - अनुग्रहाचे चित्र

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दोन शब्द !

मनाला ब्रह्मज्ञानाची गोडी लावण्याची अनेक साधने आहेत. कारण या मनाचा असा स्वभाव आहे की, एखाद्या विषयाची त्याला गोडी लागली असता ते मन त्या विषयाकडे सारखे धाव घेते. म्हणून मनाला स्फूर्ती मिळणे आवश्यक आहे. ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की,

'का जें यया मनाचें एक निकें । जे देखिलें गोडीचिया ठाया सोके ।
म्हणौनि अनुभवसुखचि कवतिके । दावीत जाइजे ॥

ज्ञानेश्वरी अध्याय ६, ओवी ४२०

माणसात ब्रह्मज्ञानाविषयी तळमळ निर्माण करून त्याला मुमुक्षु बनविण्यापर्यंत साधनांचा थोडासा पण अटळ असा अमोल वाटा संपतो. जसे जमिनीची नांगरणी करून, मशागत करून, त्यातील तण काढून टाकून ती पेरून देण्यापर्यंतचं कामही साधनं करतात. मग फक्त आकाशातून योग्य वेळी पाऊस पाडण्याचे काम शिल्लक राहते. ते मात्र या सर्व साधनांच्या आवाक्याबाहेरचं काम आहे आणि हे काम जो करतो तोच या मुमुक्षु जीवाचं साधक जीवात रूपांतर करून त्याला योग्यवेळी ब्रह्मज्ञानी बनवतो. अज्ञानी व्यक्तींना ज्ञानी बनविणारी, सुखदुःखाच्या, पाप-पुण्याच्याबद्दलचे अस्तित्वच नसलेल्या द्वंद्वात भटकत असलेल्या दुबळ्या जीवाला स्वतंत्र (मुक्त) करून परब्रह्मपदी पोहचवणारी व्यक्ती किती मोठी असली पाहिजे? ती स्वतःच त्या पदाला पोहचलेली असल्याशिवाय दुसऱ्याला तेथे कसं पोहचवील?

व्यवहारामध्ये कोणी कोणाला थोडं जरी ज्ञान दिले तरी त्यास 'गुरु' म्हणतात. गणित शिकवणाऱ्या शिक्षकालाही आपण गुरु म्हणतो. आपणाला साधी सायकल चालविण्यास शिकवणारासुद्धा आपला गुरूच असतो. परंतु त्यांना सद्गुरु म्हणत नाहीत. पण शाश्वत टिकणारे जे परब्रह्मपद त्या परब्रह्मपदाचा जो लाभ करून देतो त्यासच सद्गुरु असे म्हणतात. त्याच गुरूचा महिमा सर्व विद्वानांनी, ऋषींनी व साधुसंतांनी आणि शिष्यांनी गायलेला आहे. म्हणून संतशिरोमणी तुकाराममहाराजांनीही आपल्या अभंगातून

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आपल्या सद्‌गुरुविषयी मुक्तकंठाने स्तुती केली आहे. ते म्हणतात-

आपणासारिखे करिती तात्काळ ।

तया काळवेळ नाही लागे ॥

सर्व योगी, संन्याशी, संत, ऋषी-मुनी हे सर्व साधनांचा त्याग करून सद्‌गुरुचरणीच नतमस्तक झाले आहेत. पंढरपूरच्या विठ्ठलानं नामदेवाला सगुण दर्शन दिलं, पण ब्रह्मज्ञानासाठी स्वतः विठ्ठलच अनधिकृत असल्यामुळे विठ्ठलाने नामदेवाला विसोबा खेचराकडे पाठविलं. याचा स्पष्ट अर्थच असा आहे की, स्फूर्ती कोठूनही घ्या पण ब्रह्मज्ञानी सद्‌गुरुशिवाय होणं अशक्यप्राय आहे. म्हणून काहींनी सर्व सोडून सद्‌गुरुचरण घट्ट पकडले नि सप्तपदी ओलांडून ते निवृत्त झाले आहेत.

संत शिरोमणी तुकाराम महाराजांच्या बाबतीतही वरीलप्रमाणेच घटना घडली आहे. म्हणून सद्‌गुरु बाबाजी चैतन्यांचे चरित्र लिहिण्याचा प्रयत्न स्तुत्य आहे.

नारायणराव तापकीर

मानद सचिव, जि. शि. मंडळ पुणे



Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सद्‌गुरु बाबाजी चैतन्य चरित्र

राघव चैतन्य व व्यास यांची भेट :

सुमारे पाचशे वर्षापूर्वीची ही गोष्ट आहे. उत्तमापूर नगरीच्या परिसरात मांडवी नदीच्या किनारी सर्वत्र घनदाट जंगल पसरले होते. या निबिड अरण्यात एक सत्वशील ब्राह्मण युवक कठोर व्रत्ताचे आचरण करत होता. महर्षी व्यासांचे दर्शन व्हावे ही महत्त्वाकांक्षा मनामध्ये धरून त्याचा जप-तपाचा अखंड कार्यक्रम सुरू होता. या युवकाचे नाव होते राघव. हा युवक दिसण्यात राजबिंडा होता. त्याचे वर्णन एका ग्रंथकाराने पुढीलप्रमाणे केले आहे-

चंद्रासम सुंदर वदन । जटा शोभती हेमवर्ण ।।
सर्वांगी भस्म विराजमान । दिगंबर मूर्ति नेटकी ।।१।।

आपल्या मनातील इच्छेची पूर्तता व्हावी म्हणून तप करीत असल्याने त्याचा देह कृश झाला होता. त्याला महर्षी व्यासांच्या दर्शनाचा ध्यास लागून राहिला होता.

'व्हावे व्यासांचे दर्शन । हेचि इच्छा धरूनी पूर्ण । वातांबुपर्णाशने ।
करूनि देह शुष्क केला । जाल्या नखांच्या चुंबळी । अंगावरी वाढली धुळी ।
जटा लोंबती भूतळी । देह शुष्क जहाला ।।

अशी त्यांची स्थिती झाल्यावर त्याचा भक्तिभाव पाहून प्रत्यक्ष श्री व्यासांनी त्यांना दर्शन देऊन तत्त्वज्ञानाचा बोध केला. त्याच्या मस्तकावर कृपेचा हस्त ठेवला व अभयदान दिले आणि कानात 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र सांगितला. त्यामुळे त्यांच्या व्यथा व दुःखे नाहीसी झाली. त्यांनी आपल्या गुरूचे स्तवन करून त्यांच्या पायावर शीर ठेविले तेव्हा व्यासाने त्यास 'राघव चैतन्य' असे नामाभिधान ठेवून तू जगन्मान्य संत होशील असा आशीर्वाद दिला व ते अंतर्धान पावले. मग राघवचैतन्य

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

त्या निबिड वनात राहू लागले. त्यांना अष्टमहासिद्धी प्राप्त झाल्या. त्यांचे पशुपक्ष्यांचे भय नाहीसे झाले. सर्प, भुजंग, वन्यप्राणी त्यांच्या अंगावर खेळू लागले. स्वतः राघव चैतन्य एक महिना एका झाडावर तर दुसऱ्या महिन्यात दुसऱ्या झाडावर राहू लागले. नग्नस्थितीत राहत असता एका झाडावर पाय तर दुसऱ्या झाडावर डोके ठेवून ते झोपू लागले. कधीकधी तर वृक्षाच्या शेंड्यावर ते सिद्धासन घालून बसत असत. अशा रितीने त्यांनी बराच काळ जंगलात काढला असता अशा स्थितीत असताना त्यांना एके दिवशी पत्नी भांडल्यावर दुःख करीत बसलेले केशव चैतन्य त्या घनदाट अरण्यात भेटले. महर्षी राघव चैतन्यांनी त्यांच्यावर कृपाकटाक्ष टाकला व त्यांना आपले तात्काळ शिष्य करून घेतले.

शिवभक्त नृसिंह भटजी : केशव उर्फ बाबा चैतन्याचे पूर्वज :-

श्रीमत केशव चैतन्य उर्फ बाबा चैतन्य हे कर्नाटकातील तृणमल्ल - तिनेवेल्ली गावचे देशपांडे. त्यांचे वडील नृसिंह भटजी हे तेथील कारभार पहात. तेथे शिवगंगा सरोवराचे जवळ त्र्यंबकेश्वर नावाचे शंकराचे मंदिर होते. त्याची ते मोठ्या श्रद्धेने भक्ती करीत असत. तेथील भव्य शिवालय पाहून मुसलमानांनी त्रास देण्याचे सत्र सुरू केले. त्यांनी देवालयावर मशीद बांधण्याचे काम सुरू केले. तेव्हा नृसिंह भटजीसह सर्व ब्राह्मण मुसलमानांकडे गेले व त्यांनी विनंती केली की, देवालयाचा नाश केल्याने तुमचा घात होईल. गावावर संकट कोसळेल. परंतु त्यामुळे मुसलमानांनी या कामास आणखीनच जोराने सुरुवात केली. एवढेच नव्हे तर त्यांनी शिवलिंग काढण्यास सुरुवात केली. तेव्हा नृसिंह भटजी शिवलिंगावर पालथे पडले व ते या संकटापासून वाचव अशी देवाची प्रार्थना करू लागले. परंतु ब्राह्मणांच्या तंगड्या ओढून ते मुसलमान त्यांना दूर करू लागले. परंतु ब्राह्मण ऐकेनात हे पाहून मुसलमानांना जास्त क्रोध आला. त्यांच्या सरदाराने ब्राह्मणांच्या स्त्रियांचे डोक्यावर दगड दिले व तो त्यांना तशा अवस्थेत ताडन करू लागला. त्यावेळी काही स्त्रियांची मुले त्याने दगडावर आपटून मारली. काही स्त्रियांचे घाबरून गर्भपात झाले. त्यांनी काही स्त्रियांच्या स्तनांना चिमटे लावले तर काही ब्राह्मणांच्या गळ्याला दोर बांधून त्यांना विहिरी-आडात टाकू लागले व म्हणू लागले की 'आता शंकराचे स्मरण करा.' मुसलमानांनी त्यांची वतने हिरावून घेतली, त्यांची घरेदारे लुटली व त्यांना तेथून घालवून दिले.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मुसलमान सरदारांच्या छळाला कंटाळून नृसिंह भटजी यांनी गाव सोडले व ते ३० मैलावर असलेल्या नारायणगिरीवर वसती करून राहिले व तप आचरिते झाले. त्यावेळी मागे चमत्कार झाला. ज्या ठिकाणी मुसलमान देऊळ खणीत होते तेथून रक्ताचा प्रवाह निघाला. तेव्हा आश्चर्य वाटून त्यांनी ते काम बंद केले. त्या जागेची पूजा-अर्चा केली. शिव आमच्यावर रागावला आहे, तो नगराचा नाश करील असा विचार करून मुसलमानांनी नारायणगिरीवरच्या ब्राह्मणांची पूजा केली, विनंत्या केल्या. बादशहा तुमची वतने परत करीत आहे. द्रव्य देत आहे. तेव्हा ब्राह्मण परत आले. त्यांनी शंकराची आनंदाने पूजा केली. शिवशंकर आमच्यावर प्रसन्न झाला आहे असे ते म्हणू लागले. सर्व लोक ब्राह्मणांना भेटावयास सामोरे आले. परंतु नृसिंह भट मात्र तेथेच नारायणगिरीवर तप करू लागले. पहिल्या महिन्यात उपवास, दुसऱ्या महिन्यात फक्त पाणीच प्राशन करावे असे तप त्यांनी सुरू केले. जटा वाढविल्या. परमेश्वराची भक्ती केली. त्यांनी परमेश्वराची दया भाकली. ते म्हणाले, 'हे परमेश्वरा, देवा, मला धनधान्य, पुत्र, संपत्ती वगैरे काही नको' या सेवकाला तू पायाचा दास करून घे.'' देवालाही वाटले की या भक्ताच्या संकटाचे निवारण केले पाहिजे. याने आमच्यावर संकट आणले आहे. याची सोडवणूक केली नाही तर हा प्राणत्याग करेल, म्हणून परमात्मा त्याचे स्वप्नी येऊन म्हणाले की, 'हे माझ्या बाळा, तुला मी विनाकारण त्रास दिला, तुझे दुःख निवारण करण्यासाठी मी तुझ्या पोटी जन्म घेईन. तुझ्या तपामुळे मी संतुष्ट झालो आहे. तू या ठिकाणाहून निघून जा.'' अशी आज्ञा ऐकल्यावर नृसिंहभटास आनंद झाला व ते काही दिवसांनी तेथून निघून जाऊ लागले. वाटेने जात असता ते एका नदीकाठी आले. दुपारची वेळ झाली होती. भुकेने जीव व्याकूळ झाला होता. प्रथम गंगास्नान करावे असा विचार करून त्यांनी नदीचे पाणी हातात घेतले तोच त्यांना एक नृसिंहाची मूर्ती हातात मिळाली ते पाहून त्यांना अत्यंत आनंद झाला. त्या मूर्तीची त्यांनी षोडशोपचारे पूजा केली. मूर्तीपुढे नतमस्तक झाले व आपल्या पत्नीसह आनंदाने प्रवास करीत ते पुणे येथे आले. येथे काही दिवस राहिल्यावर आनंदीबाई गरोदर राहिल्या व त्यांना पुत्ररत्नाचा लाभ झाला. सुचिन्हे सर्व अंगावर असणारा हा मुलगा म्हणजे साक्षात परमेश्वरच वाटला. प्रत्यक्ष बाळंतपणाचे वेळी परमेश्वरासमोर येऊन म्हणाले, 'मी वैकुंठ सोडून

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

तुझ्या पोटी आलो आहे' व अदृश्य झाले. तेरा दिवस पूर्ण झाल्यावर या बाळाचे नाव 'विश्वनाथ' ठेवले. थोरला त्र्यंबक, दुसरा विश्वनाथ व तिसरा बापू. विश्वनाथ प्रथमपासून संसाराविषयी उदास परंतु परमेश्वरावर भक्ती असणारे असे झाले. पुढे काही दिवसांनी नृसिंह भट कालवश झाले.

गुरुशिष्य भेट :

तीन भाऊ एकत्र राहत असता पुढे कुटुंबात भांडण झाले. विश्वनाथाचे लक्ष संसाराकडे नसल्याने त्यांचे दोघे भाऊ त्यांच्याशी भांडू लागले व एके दिवशी त्यांनी त्यास घराबाहेर काढले. त्यांची पत्नी गिरजाबाई ही त्यांचेबरोबर एका वस्त्रानिशी बाहेर पडली. तीर्थयात्रेचा मानस धरून ते त्र्यंबकेश्वरास जाण्यास निघाले व प्रवास करता करता उत्तमापूरला म्हणजे ओतूरला आले व वसती करून राहिले. जवळ पैसा-अडका नाही. अंगावर धड वस्त्र नाही, खाण्यास घरात मूठभर अन्न नाही म्हणून त्यांची पत्नी गिरजाबाई खूप रागावली. म्हणून तेही जंगलात रागाने निघाले व मांडवीतिरी आंघोळ करावयास आले असता पत्नीचे कठोर शब्द आठवून रडू लागले. त्याच वेळी राघवचैतन्यांची त्यांची गाठ पडली. विश्वनाथ भटजींचे पूर्वपुण्य उदयास आले. त्यांना पाहून विश्वनाथांना खूप आनंद झाला. राघवचैतन्यांनी त्यांची चौकशी केली व विचारले, "तू येथे कोठून आला? तू दुःखाने का रडत आहेस?" तुझ्या घरी कोण कोण आहेत?" ती माहिती मला सांग. त्यावर विश्वनाथ बाबा उत्तरले की "मी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून माझे नाव विश्वनाथ आहे. माझे बंधू पुनवडी येथे राहतात. तेथे काही काळ राहिल्यानंतर भावांनी भांडणे केली म्हणून आम्ही पती-पत्नी येथे आलो आहोत. आणि एका ब्राह्मणाच्या घरी राहत आहोत. परंतु पत्नीच्या कटु बोलण्याने मी विटलो." बायको म्हणाली, "या घरात खाण्यास अन्न नाही की अंगास वस्त्र नाही, पोटी पुत्र संतान नाही किंवा कानात साधी बाळी बुगडी नाही, घटकाभर सुखही याचे संगतीने मिळाले नाही. याने अद्याप एक पैसा मिळविला नाही. त्यामुळे याला भावाने हुसकून दिले आहे. हा कोणास काही बोलत नाही, की काही काम करीत नाही. फक्त घरात गुपचूप बसतो. मग त्याऐवजी रानावनात तपाचरण करण्यास तरी का जात नाही?" हे सर्व पत्नीचे निंदाजनक उद्‌गार ऐकून माझ्या मनाला अतिशय संताप झाला आहे. हा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सर्व दुःखाचां पर्वत माझ्यावर कोसळला आहे. परंतु आपल्यासारखे दयासागर भेटलेले पाहून मला आनंद झाला आहे. या त्रिलोकात महाराज मला कोणी कोणी नाही. त्याचे हे उद्‌गार ऐकून राघव चैतन्य आदराने म्हणाले, "तू म्हणतोस मला पुत्र नाही, परंतु तुला मी सर्व काही आहे. असे समज. मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे." असे म्हणून त्यांनी त्याला आपल्या मांडीवर बसविले व हातानी कुरवाळले, तोंडावरून हात फिरविला, पुत्रवत प्रेमाने उपदेश केला. परंतु विश्वनाथ बाबाचे मन बायकोबद्दल विटले होते. ते म्हणाले महाराज, 'माझी बायको भारी रागीट आहे. तलवारीच्या धारेप्रमाणे ती मला कटू वचने बोलते. मला प्रपंचाचे ज्ञान नाही, पैसा मिळविता येत नाही, त्यामुळे ती मला सतत त्रास देते, गांजते. तिचा त्याग करण्याची माझी इच्छा आहे. महाराज कृपया मला संन्यास दीक्षा द्यावी म्हणजे सुटलो एकदाचा!" तेव्हा महाराज म्हणाले, 'लग्नाचे वेळी तू आपल्या बायकोबरोबर राहण्याची प्रतिज्ञा केली आहे. त्यामुळे स्त्रीऋण फिटेपर्यंत तुला संसार त्याग करता येणार नाही. एखादे मूलबाळ झाल्यावर तू तिचा त्याग कर. मी तुला आशीर्वाद देतो की तुला पुत्रप्राप्ती होईल." नंतर स्वामींनी त्याच्याकडे भोजनाची इच्छा प्रकट केली. मग विश्वनाथ बाबा गावात गेले. गिरजाबाईला सर्व वृत्तांत सांगितला. तिने केलेले उत्तम भोजन घेऊन ते स्वामीकडे परतले. स्वामींची नखे चुंभळीप्रमाणे झाल्याने बाबांनी त्यांना आपल्या हातांनी भरविले व उरलेले अन्न घेऊन बाबा घरी आले. पुढे गिरजाबाईस दिवस गेले. व पुत्ररत्नाचा लाभ झाला.

संन्यास दीक्षा व तीर्थाटन :

त्या पुत्राचे नाव नृसिंह असे ठेवले. नामकरण झाल्यावर विश्वनाथबाबांनी संन्यास दीक्षेची स्वामीकडे याचना केली. स्वामींनी त्यांना दीक्षा दिली. आश्रम नियमानुसार त्यांचे नाव केशव चैतन्य असे ठेवले. व त्यांना शुद्ध चैतन्याचा बोध करून अद्वैताची खूण पटविली. त्यावेळी त्यांचे वय फक्त २६ वर्षांचे होते. त्यांनी त्यांना उपदेश केला, ते म्हणाले, 'तू आता ब्रह्माकार झाला आहेस तू मला अनन्य असा शिष्य भेटलास." काही काळ ते गुरुशिष्य तेथे राहिले. थोड्याच दिवसांनी दोघे गुरुशिष्य तीर्थाटनासाठी बाहेर पडले. नाशिक, त्र्यंबकेश्वर, द्वारका, बद्रीकेदार, प्रयाग या तीर्थक्षेत्री जाऊन शेवटी ते काशीक्षेत्री आले. गंगेचे स्तवन

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

करून व मनकर्णिकेत स्नान करून ते दोघेही काशी विश्वेश्वराच्या दर्शनासाठी मंदिरात आले. दोघे गुरु-शिष्य शिवाचे स्तवन करीत असता त्यांची भक्ती पाहून काशीविश्वेश्वर प्रसन्न झाले व काशीविश्वेश्वराचे लिंग डोलू लागले. हे अद्‌भुत दृश्य पाहण्यास काशीतील लोकांनी तेथे गर्दी केली. त्यांनी या गुरु-शिष्यद्वयांना मनोभावे वंदन केले. काशीविश्वेश्वराचे शिवलिंग एक प्रहरपर्यंत डोलत होते. ते झाल्यावर लोकांनी त्यांचा सत्कार केला. त्या ठिकाणी लोकांनी भरपूर पैसा जमवून या चमत्काराच्या स्मृतीप्रित्यर्थ काशीक्षेत्रात एक दुसरे शिवालय बांधले. ते 'केशव-चैतन्य शिवालय' म्हणून आजही ओळखले जाते. नंतर ते दोघेजण काशीहून जगन्नाथपुरीस आले. समुद्रस्नान करून त्यांनी जगन्नाथाचे दर्शन घेतले.

कलबुर्ग्यास दाखविलेला चमत्कार :

तेथून ते कल्याण-कलबुर्ग्यास आले. त्यावेळी पाऊस पडत होता. रहावयास तेथे जागा नव्हती. म्हणून ते एका मशीदीत उतरले. पायातील खडावा काढून त्यांनी त्या मशिदीच्या कोनाड्यात ठेवल्या व विश्रांती घेऊ लागले. सायंकाळी मशिदीचा मुल्ला दिवे लावण्यासाठी मशिदीत आला. पादत्राणे कोनाड्यात पाहून त्याचा राग अनावर झाला. तो या दोघांना वेडेवाकडे बोलू लागला. तो म्हणाला, 'मशिदीमध्ये जोडे ठेवून तुम्ही आमचा धर्म बुडवित आहात. हा इस्लामचा अपमान आहे. याचे परिणाम चांगले होणार नाहीत.'' असे म्हणून तो काजीकडे गेला व त्याने ही सर्व हकीकत काजीला सांगितली. तो म्हणाला, 'त्या दोघा साधूंना मी समजावून सांगितले. परंतु त्यांनी ऐकले नाही.' त्यानंतर काजी त्वरित मशिदीमध्ये आला व गुरुशिष्याला उद्देशून क्रोधाने बोलू लागला की, 'तुम्ही संन्याशी ब्राह्मण आहात, परंतु तुम्ही तुमच्या जातीच्या ब्राह्मणाचे घरी न उतरता तुमचा धर्म सोडून आमचा धर्म बुडवू पहात आहात. तरी तुम्ही येथून ताबडतोब निघून जा. नाहीतर शिक्षा होईल.'' तरीसुद्धा ते गुरु-शिष्य तेथेच ठाण मांडून बसले आहेत हे पाहून काजीने मुलाण्याला निजामशहाकडे निरोप घेऊन धाडले. ही बातमी वाऱ्यासारखी गावात पसरली. गावातील मुसलमान मशिदीभोवती जमा झाले. निरोप मिळताच निजामशहा सैन्य घेऊन तेथे आला. परंतु लोकांनी सारा वृत्तांत सांगताच तोही मनात दचकला. परंतु त्याने गावातील ब्राह्मणास त्रास देण्यास सुरुवात केली. तेव्हा गावातील सर्व ब्राह्मण मुलाबाळांसहित स्वामीजवळ

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आले व रडू लागले व म्हणाले, 'तुम्हामुळे आम्हाला त्रास सहन करावा लागत आहे. आम्हाला गाव सोडून जाण्याची वेळ आली आहे.'' हे ऐकून स्वामी विचार करू लागले की आपल्यामुळे येथील ब्राह्मणांना रातदिन त्रास होत आहे तर आपणच गाव सोडून जाणे योग्य होईल. स्वामी तेथे आलेल्या मंडळींचे सांत्वन करीत असतांनाच बादशहाची स्वारी तेथे हजर झाली व त्याने विचारपूस सुरू केली. 'तुम्ही कोण आहात? आमच्या मशिदीमध्ये का राहिलात? आमच्या नमाज पडावयाचे ठिकाणी जोडे का ठेवले? कृपा करून तुम्ही येथून ताबडतोब निघून जा. नाहीतर तुम्हास शिक्षा भोगावी लागेल.'' असे बादशहाने त्यांना सांगितले. तेव्हा ते संन्याशी म्हणू लागले की, 'तुम्ही तुमची मशीद आहे असे म्हणता तर तिला बोलावून घेऊन जा. आम्ही जमिनीवर बसलो आहोत तुमच्या मशिदीला शिवलोदेखील नाही. आम्ही कोठे गेलो नाही किंवा आलो नाही, आम्ही आमच्या जागेवरच आहोत.'

बादशहाने वृथाभिमानाने मशिदीची प्रार्थना केली व कानात बोटे घालून 'मशिदी माँ, मशिदमाँ मेरे साथ चल' म्हणून तो ओरडू लागला. परंतु मशीद तसूभरही हलली नाही. बादशहा खिन्न झाला तेव्हा लोकांना चमत्कार दाखविण्यासाठी स्वामींनी मशिदीला बादशहादेखत विचारले, 'तू कोण आहेस?' तेव्हा मशिदीतून आवाज आला मी तुमची आंदण दासी आहे. तेव्हा स्वामी तिला म्हणाले 'बादशहाचे हे ठिकाण सोडून माझ्याबरोबर चल.'' तेव्हा स्वामीसह मशीद उडू लागली व कलबुर्गे (हल्लीचे गुलबर्गा) सोडून पाव कोसावर जाऊन थांबली. परंतु चिमूटभर मातीसुद्धा खाली पडली नाही. आता तेथे लोकांचा उपद्रव होऊ नये म्हणून स्वामी तेथे अदृश्य झाले.

हे सर्व दृश्य पाहून बादशहास आपल्या कृतकर्माचा पश्चाताप झाला. तो मशिदीमागे पळू लागला व जेथे मशीद थांबली तेथे येऊन त्या दोघा स्वामींची भेट घेण्याचा त्याने प्रयत्न केला. परंतु ते दोघेही गुप्त झालेले पाहून दुःखी झाला. या पापाचे परिमार्जन व्हावे म्हणून बादशहाने अनेक दिवस तेथे उपवास केला. मग त्यांनी त्या मशिदीमध्ये दोघा संन्याशाच्या कबराशेजारी शेजारी बांधल्या व त्यांची नावे 'राघव दराज' व 'केशव दराज' अशी ठेवली. आजही आपण गुलबर्ग्यास गेल्यास या दोन्ही कबरींचे दर्शन आपणास घडते. अद्यापही या कबरींच्या उजव्या बाजूस

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ब्राह्मण व डाव्या बाजूस मुसलमान बसून कबरीची पूजा-अर्चा केली जाते. बादशहाने उपोषण सुरू केल्याचे पाहून, तसेच हिंदूचा छळ केल्याने बादशहा पश्चातापदग्ध झाल्याचे पाहून स्वामी प्रसन्न झाले व तेथून दीड योजने दूर असलेल्या आळंद-गुंजोटीस प्रकट होऊन बादशहास दर्शन दिले. बादशहाची भक्ती पाहून राघवचैतन्यांनी आळंद-गुंजोटी येथे समाधी घेतली व केशव चैतन्यास त्यांच्या अनुष्ठान स्थळी म्हणजे ओतूर येथे जाण्याची आज्ञा केली.

गुरुवियोग सहन न झाल्याने केशव चैतन्य ओतूरला न येता तीन कोसावर 'मान्यहाळ' गावी मठी बांधून राहू लागले व राघव चैतन्याच्या समाधीच्या दर्शनाला नियमित येऊ लागले. नंतर पुन्हा राघव चैतन्यांनी प्रकट होऊन केशवचैतन्यांना दर्शन दिले व अनुष्ठानस्थळी जाऊन लोकांना चमत्कार दाखवून त्यांचा उद्धार कर असे सांगून ते अंतर्धान पावले. मान्यहाळहून केशव चैतन्य ओतूरला गेल्यावर लोकांनी त्यांच्या पादुका मठामध्ये स्थापन केल्या. लोक त्यांना केशवचैतन्य म्हणून लागले तर काही लोक त्यांना बाबाजी चैतन्य नावाने संबोधू लागले.

सर्वजण म्हणती केशव चैतन्य !
भाविक म्हणती बाबाजी चैतन्य!
दोन्ही नामे एकचि जाण!
अत्यादरे बोलती !!

गुरुआज्ञेप्रमाणे केशवचैतन्य ओतूरकडे प्रयाण करते झाले. परंतु ते प्रथम नाशिक येथे गेले तेथून त्र्यंबकेश्वराच्या दर्शनास गेले. ब्रह्मगिरीला प्रदक्षिणा घालून तें ओतूरला आले व मांडवी नदीच्या काठी तपश्चर्या करू लागले. जंगलातील फळे, कंदमुळे भक्षण करून निर्वाह करू लागले. बरेच दिवसांनी केशव चैतन्य गावी आल्याची बातमी भिल्लांकडून गावकऱ्यांना समजली. गावातील सर्व जातीधर्माचे लोक स्वामींच्या दर्शनास आले. त्यांनी सांगितले की स्वामी, 'तुमचा पूर्वाश्रमीचा पुत्र नृसिंहभट त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई गरोदर असता वारले. पुढे काही दिवसांनी लक्ष्मीबाई बाळंत होऊन त्यांना पुत्र झाला आहे, पुढे खुद्द सूनबाई लक्ष्मी आपल्या पुत्रास घेऊन स्वामींच्या दर्शनास आली व मूल स्वामींच्या पायावर ठेवून मोठ्याने रडू लागली व म्हणू लागली की, 'याचे पालन पोषण कोण करणार? याचे नाव सुद्धा अद्याप ठेवले नाही.'' तेव्हा स्वामी म्हणाले की, 'याचे संगोपन

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

मी करीन. घरी जाऊन याचा नामकरणविधी करावा.'' नंतर लक्ष्मीबाई घरी आल्या, गावातील सुहासिनी गोळा करून मुलाचे नाव 'केशवभट' असे ठेवले. गावातील लोकांनी धनधान्य व द्रव्य पाठवून त्याचे संगोपन केले. स्वामींची कीर्ती हळूहळू सर्वत्र पसरू लागली. गावात भजन, प्रवचन, कीर्तने सुरू झाली. यात्रेकरू गावात येऊ लागले. लोक नवस करू लागले. नवसाप्रमाणे चैतन्यमहाराज लोकांचे मनोरथ पूर्ण करू लागले.

मुकुंदभटाचे घरी गंगा आली :

गावात मुकुंदभट नावाचा एक ब्राह्मण भिक्षा मागून रहात असे. त्याच्या मनात स्वामीबद्दल आदर होता. त्याच्या पत्नीचे नाव रेणुकाबाई होते. ती अत्यंत कजाग व भांडखोर होती. तिच्या कपाळावर नेहमी आठ्यांचे जाळे पसरलेले असे. ती रात्रंदिवस आपल्या नवऱ्याला गांजीत असे. तिच्या असंख्या स्वभावामुळे तिच्या घराचा उंबरठा सहसा कोणी ओलांडीत नसत.

एकदा सकाळी उठून मुकुंदभट स्वामीपाशी गेले व 'आपण माझ्या घरी भोजनासाठी या' असा आग्रह करू लागले. तेव्हा स्वामी म्हणाले की, 'मला अन्न सोसत नाही, त्यातून तुझी बायको कटकट करणारी, त्यामुळे मी तुझ्या घरी येत नाही.'' तेव्हा मुकुंदभट जोशी पुन्हा पुन्हा हात जोडून विनंती करू लागला व माझ्या गरिबाचे एवढे मनोरथ पूर्ण करावे असे म्हणून पायावर लोळण घेऊ लागला. हे संकट पाहून स्वामींनी येण्याचे कबूल केले. उन्हाळ्याचे दिवस होते, मुकुंद भट आनंदाने घरी निघाला, वाटेने येता येता त्यांना रस्त्याशेजारी एक खळे दिसले. त्या खळ्यावर एक शेतकरी करडया करीत होता. तेव्हा त्याने त्या शेतकऱ्याला सांगितले की, 'माझ्याकडे आज स्वामीमहाराज जेवावयास येणार आहेत तरी काही धान्य द्यावे, असे भिक्षुकी वृत्तीने सांगितले. त्याने या वेड्या भिक्षुकास शेरभर करडया देऊन वाटेला लावले. मग जोशीबुवा घरी आले व बायकोस म्हणू लागले की, 'चैतन्यस्वामी आज आपणाकडे भोजनास येणार आहेत अन् तू भिंती काय सारवतेस? झटकन् स्वयंपाक कर.'' त्याच्या पत्नीने नदीचे पाणी आणून सारवण काढले होते. बारा वाजण्यांचा सुमार झाला होता. ती भुकेने व्याकूळ झाली होती. घरची मुले रडत होती. भुकेने तडफडत होती. घरात अन्नाचा कण नव्हता. जोशीबुवांचे हे ऐनवेळचे बोलणे ऐकून रेणुकेला अतिशय क्रोध आला. ती म्हणाली, 'मेल्या, शेरभर करड्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आणल्या व स्वयंपाक कर म्हणतोस व गुरूचा मोठेपणा सांगतोस. तुला लाज कशी वाटत नाही? मेल्या, तुझा गुरूही दुष्ट आहे व तू तर त्याच्यापेक्षाही दुष्ट आहेस. घरात फुटके भांडे नाही, घरात भाजीचा देठ नाही, मी काय स्वामीपुढे डोके फोडू?' असे बोलून ती अतिशय संतापली. एवढेच नव्हे तर तिने चुलीतील एक जळते लाकूड ओढून नवऱ्याच्या पाठीत घातले. तेव्हा नवरा पळू लागला. भांडण रस्त्यावर आले. रेणुकाबाईने रस्त्यावर अर्वाच्य बोलून सारा गाव गोळा केला. ती लोकांना सांगू लागली की, "हा गाव जोशी पण गावात पंचांग न सांगता त्या संन्याशाजवळ बसतो. दसपिंड पाडीत नाही की इतर कामे पाहत नाही. त्यात दोष आहे असे म्हणतो. हा जन्माचा भिकारी. याचे संगतीने अन्न मिळत नाही. हा द्वाड आहे. वडिलांनी घरात आड खणला पण त्यातील गाळ काढून तो सुद्धा नीट करीत नाही असा हा आळशी. माझी पोराबाळांची पाटी. त्यांना खावयास मिळत नाही. त्यामुळे दिनवाणी दिसतात. इथं फुकटचं पाणी मिळत नाही. याचा मला वीट आला आहे. हा मेला संन्यासी झाला तरी चालेल म्हणजे याचा माझा संबंध तरी तुटेल. हा माझा नवरा नाही वैरी आहे. हा बैलोबा माझ्या पदरी कसा पडला हे समजत नाही?" असे म्हणून तिने गळा काढला.

मग शेजारी-पाजारी समजुतीच्या सुरात म्हणू लागले, 'हा असाच दुर्जन आहे. तू फार शहाणी म्हणून संसार, तू रडू नकोस. गप्प बैस. आम्ही तुला धान्य, भाजीपाला देतो. तू घरी जाऊन स्वयंपाक कर व स्वामींना जेवू घाल, मग रेणुकाबाईंनी साहित्य घेऊन घरी जाऊन स्वयंपाक केला.

दुपार टळल्यावर स्वामींना आमंत्रणाची आठवण झाली. त्यांचे घरी जाण्यासाठी त्यांनी एक महासर्प बोलाविला व त्यावर बसून ते गावात आले. हे समजताच लोक त्यांच्या स्वागतास सामोरी आले. स्वामींना घरी आल्याचे पहाताच रेणुकाचा क्रोध मावळला. तिला मनात अतिशय आनंद झाला. ती स्वामीजवळ येऊन प्रार्थनेच्या स्वरात म्हणाली की, 'महाराज माझ्या घरासमोर आड आहे पण त्याला पाणी नाही. पाणी लांबून आणावे लागते. म्हणून भोजनास उशीर झाला म्हणून राग धरू नये." मग तिने हातपाय धुण्यासाठी स्वामींना तांब्याभर पाणी दिले. स्वामींनी जमिनीवर बोटाने लहान आळे केले. मग स्वामींनी पायावर पाणी ओततात तेथे गंगा उत्पन्न झाली. तिच्या स्वच्छ पाण्याचा पाट नदीकडे वाहू लागला. लोक



सद्गुरु केशव चैतन्य उर्फ बाबाजी चैतन्य यांचे समाधी स्थळ.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आश्चर्याने पाहू लागले. त्या पवित्र पाण्यात सर्वजण स्नान करू लागले. सुहासिनी पंचारती ओवाळू लागल्या. मंगलवाद्ये वाजू लागली. गावात सर्वत्र उल्हासाचे व आनंदाचे वातावरण पसरले. नंतर रेणुकाबाई स्वामींना म्हणाल्या, महाराज! माझी मुले लहान आहेत ती कदाचित पाण्यात बुडतील. कृपया गंगा खाली न्यावी.'' स्वामींनीं गंगेची प्रार्थना केल्यावर गंगा जमिनीखाली गेली. नंतर स्वामींनी भोजन केले. सर्वांना आशीर्वाद देऊन ते म्हणाले, 'तुमचे दारिद्र्य जाऊन तुम्ही श्रीमंत व्हाल, तुमची मुले विद्वान होतील व तुमचे कल्याण होईल.' असे म्हणून स्वामी सर्पावर बसून पुन्हा अरण्यात निघून गेले.

ही वार्ता सर्वदूर पसरल्यावर लोक दर्शनास येऊ लागले. आंधळे लोक डोळे मागू लागले. पीडित बरे होऊ लागले. पुढे पुढे लोकांचा त्रास होऊ लागला. स्वामींनी विचार केला की, प्राणी आपल्या कर्मानी दुःखी होतो. या लोकांना विवेक नाही, कोणासही भेट घेता येऊ नये म्हणून समाधी घेणे इष्ट आहे. असा विचार स्वामीनी केला.

आता आपण करावी समाधी । चुकवावी जन उपाधी । भेटू नये कोणासी कधी । ऐसीची आजी करावे ॥

मग चैतन्यस्वामी मांडवी नदीच्या दक्षिण तिरी' आणिमा' सिद्धी प्रकट करून समाधीस बसले. व संजीवन समाधी घेतली.

जैसे जीवनी जीवन । की गगनी मिळाले गगन । तैसे चिदाकाशी केशव चैतन्य एक भावे पातले ॥

हे पाहून गंधर्व गायन करू लागले, अप्सरांनी नर्तन सुरू केले देवांनी पुष्पवृष्टी केली ।

धन्य ते चैतन्यमूर्ती । ब्रह्मविद योगींद्र चक्रवर्ती । ब्रह्मरूपी मिळाले ॥

आसन निश्चल झाले. समाधीवर वारूळ वाढले, चैतन्य स्वामी चिदाकार झाले. तो दिवस गुरुवार, वैशाख वद्य १२, प्रजापति नाम संवत्सर शके १४९३, इ. स. १५५१. बादशहानेही या गोष्टीची दखल घेतली. या शकाची सरकारी कागदोपत्री नोंद केली. 'इसन्नै-सबैनी' हा अरबी शक लिहिला.

बादशहाने समाधीस उत्पन्न व ताम्रपट दिले. सदर प्रसंगी भजन, कीर्तने झाली. भोजने झाली. सर्वत्र आनंदी आनंद झाला.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जुन्नरच्या सुभेदारास लोभीपणाचे प्रायश्चित्त

स्वामी चैतन्य महाराजांनी समाधी घेतली तरी ते आपल्या भक्तांबरोबर वेळप्रसंगी संभाषण करीत असत. उत्तमापुरात नृसिंहभटजींची बायको लक्ष्मी आपल्या छोट्या केशवाचे संगोपन करीत होती. त्यास पाच वर्षे पूर्ण झाल्यावर ती विचार करू लागली की स्वामीनी तर आता समाधी घेतली आता या मुलाचा व्रतबंध कोण करणार? याचे शिक्षण कोण करणार? तेव्हा तो लहान मुलगा आईस म्हणू लागा की, 'आपणास स्वामीशिवाय दुसरे कोण आहे? आपली चिंता त्यांना आहे, तू विनाकारक दुःख करू नकोस. आपण स्वामींच्या समाधीजवळ जाऊन सर्व अडचणी त्यांना कथन करू. मग दोघे मायलेक समाधीजवळ जाऊन बसले व त्यांनी स्वामींचे स्तवन आरंभिले व म्हणू लागले की, 'हे स्वामी समाधीपूर्वी आपण म्हटला होता की, "मुलाचे पालन करीन मग त्याचा प्रत्यय आला पाहिजे. त्याचे व्रतबंध, अध्ययन याची जबाबदारी तुमच्यावर आहे." अशी करुणापूर्ण प्रार्थना ऐकून समाधीतून प्रत्युत्तर आले की "या मुलाची मुंज गावकरी करतील. नंतर याला माझ्याकडे आणित जावे. मी त्याचे अध्ययन करीन. त्याच्या संगोपनाची मला चिंता आहे." अशी उत्तरे ऐकल्यावर लक्ष्मीला अतिशय आनंद झाला.

नंतर तिने गावात येऊन सारा वृत्तांत गावकऱ्यांना सांगितला. ग्रामस्थांनी धनधान्य, पैसा अडका जमवून अतिशय थाटामाटात व्रतबंध केला. आईस व मुलास पोशाख केला. मुलाची बुद्धिमत्ता पाहून लोक म्हणू लागले की, चैतन्यस्वामींच्या कृपेने हा महाविद्वान होईल. मग एके दिवशी मुलास मंगलस्नान घालून त्याची आई त्याला समाधीपाशी घेऊन गेली व प्रार्थना केली की याचा व्रतबंध झाला आहे. याच्या अध्ययनास सुरुवात व्हावी व त्याचबरोबर आमच्या निर्वाहाची सोय व्हावी. नंतर स्वामींनी त्यास श्रीमद्भागवत सांगितले. त्याचे त्याने अवधानपूर्वक अध्ययन केले. व्यासापासून जे वेद राघवचैतन्यापर्यंत आले तेच त्यांनी त्यास सांगितले व त्यास भक्ती करण्याचा उपदेश केला. नंतर स्वामींनी स्वतःचे स्वरूप सांगण्याचा प्रयत्न केला. अद्वैताचे ज्ञान दिले.

प्रत्येक दिवशी केशव भागवत घेऊन तेथे जात असे व पुराण सांगे. नंतर पुराण संपल्यावर एक महासर्प तेथे येई व एक होन तेथे ठेवून निघून जाई. असे चार होन दररोज केशवला मिळत असत. हे होन आईस

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दिल्यावर त्यांचा प्रपंच चालत असे. त्याची आई हे होन चंबूत घालून ठेवून देत असे. पुराण सांगत असता स्वामी समाधान पावत व त्यास आशीर्वाद देत. पुढे विद्या प्राप्त झाल्यावर एका ब्राह्मणाच्या सुशील मुलीबरोबर केशवभटाचे लग्न झाले.

एके दिवशी त्याच्या आईने त्यास भाजी विकत आणण्यासाठी एक होन दिला व बाजारात पाठविले व लवकर येण्यास सांगितले. त्याने एक होन देऊन एक शेर भाजी आणली. ही बातमी लोकांना कळली तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले. गावात चर्चा सुरू झाली. कोणी म्हणू लागले की, 'हा ब्राह्मण भोळा आहे.' तर कोणी म्हणू लागले की 'याच्यापाशी फार होन आहेत.' म्हणून हा एकशेर भाजीसाठी एक होन देतो. ही बातमी कर्णोपकर्णी सर्वत्र पसरली. एवढेच नव्हे तर जुन्नरचे सुभेदार बिबीसाहेब यांनाही कळली. त्याने हे ऐकून तोंडात बोट घातले. पैशाच्या लोभाने त्याच्या मनात एकदम दुष्ट भाव निर्माण झाला.

त्याने दूत पाठवून केशव भटजीला जुन्नर येथे घेऊन येण्याची आज्ञा फर्मावली. दूत ओतूरला येऊन केशवभटजीची चौकशी करू लागले. लोकांना वाटले की केशवभटजीच्यावर विनाकारण विघ्न आले. बिबीसाहेबांकडे कोणीतरी चहाडी केलेली दिसते. शेवटी शिपायांनी केशवभटाला पकडून जुन्नरला नेले. बिबीसाहेबापुढे उभे केले. बरोबर नेलेले चंबूभर होनही बिबीसाहेबांच्या पुढ्यात ओतले. तेव्हा बिबीसाहेब केशवला दम देऊन विचारू लागले की, "तू तर लहान आहेस मग हे होन तुझ्याजवळ कोठून आले? हे सांग नाही तर तुला शिक्षा करीन." त्यावेळी केशवभट म्हणू लागले की, 'देव देतो त्यावेळी मी हे होन घेतो व त्यावर माझी उपजीविका चालवितो. मग मला विनाकारक का छळता? 'मी कुणाची चोरी केली नाही." मग बिबीसाहेब म्हणू लागले की 'जो देव तुला होन देतो तो आम्हास दांखव.' मग केशवभटाला घेऊन बिबीसाहेब तात्काळ ससैन्य ओतूरला त्याच दिवशी दाखल झाले व होन मिळण्याचे ठिकाण दाखविण्याबद्दल केशवभटाला धमकी देऊ लागले. नाइलाजाने केशवभट बिबीसाहेबांना घेऊन समाधीस्थानाजवळ गेले. मनात अविवेक निर्माण झाल्याने व संपत्तीचा लोभ सुटल्याने बिबीसाहेबांनी समाधीस्थळ खणून उद्ध्वस्त करण्याची आज्ञा सैनिकांना दिली. पडत्या फळाची आज्ञा घेऊन सैनिकांनी ती पवित्र वास्तु खणण्यास आरंभ केला. अविचाराने

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सैनिकांनी समाधीवर कुदळी मारली. ती स्वामीचे मस्तकावर लागली. त्यातून रक्ताची धार वाहू लागली. स्वामी क्रोधित झाले. इतक्यात समाधीतून असंख्य काळे-तांबडे मुंगळे बाहेर पडू लागले व शिपायांच्या अंगाला चावू लागले. जेथे ते चावत त्या शरीराच्या भागाचा ते तुकडाच पाडू लागले. सैनिकांच्या अंगातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या. मग ते रस्ता फुटेल तिकडे पळू लागले. पण आता काय चमत्कार झाला की रक्ताचे मोठमोठे भुंगे तयार झाले. ते सैनिकांचे पाठीमागे लागले. त्यांनी कित्येकांचे नाक, कान, डोळे तोडून काढले. काहींचे डोळे फोडले. मुसलमान सैनिक तोबा तोबा म्हणून ओरडू लागले. शस्त्रे व हत्यारे जागच्या जागी राहिली. घोडे उधळले. हत्ती वाट फुटेल तिकडे जंगलात पळाले. कित्येक मुसलमान सैनिक पळता पळता वाटेतच मेले. काहींनी गुन्हा माफ कर म्हणून परमेश्वराची प्रार्थना केली ते बचावले. बिबीसाहेब घोड्यावर बसून झटकन पळाला. भुंगे एक मैल त्यांच्या पाठीमागे लागले. व तेथे जाऊन त्याला चावले. त्याचा प्राण तेथेच गेला. त्याची कबर प्राण गेला त्या ठिकाणी बांधली आहे. त्या कबरीला 'दस्तुरखान' नावाने ओळखतात. दुसरा एक अधिकारी गावापर्यंत पळाला. परंतु त्यालाही भुंग्यांनी प्रसाद दिला. त्याच्या कबरीला मस्तानखान असे नाव आहे. अशा प्रकारे मुसलमान सैन्याची धूळधाण झाली. बहुतेक सैन्य ओतूरच्या परिसरात मरून पडले. आज पीरांच्या रूपाने त्याची स्मारके ओतूरच्या आसमंतात आढळून येतात. या लढाईस भुंग्यांची लढाई म्हणतात.

इकडे जुन्नरला ही बातमी कळल्यावर मोगलांचे घरी रडारड सुरू झाली. समाधीतून मोठा सैतान निघाला व त्याने सर्वांना ठार केले म्हणून सैनिकांच्या स्त्रिया आक्रोश करू लागल्या. ही घटना घडल्यावर ओतूरग्रामस्थ समाधीजवळ जमले. त्यांनी स्वामींची प्रार्थना केली. वेदपारायण केले, ब्राह्मणभोजन घातले. स्थलशुद्धी केली. केशवभटजींने समाधीजवळ जाऊन भागवत वाचले. परंतु समाधीतून स्वामींचा आवाज आला नाही म्हणून तो रडू लागला. तेव्हा समाधीतून आवाज आला, 'तुझ्या प्रार्थनेने मी प्रसन्न झालो आहे. परंतु येथून पुढे मी तुझ्याशी बोलणार नाही. तू घरी जा व शांत रहा. तुझ्या संकटसमयी मी तुझ्या मदतीला येईन. काळजी करू नकोस.

●●●

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

स्वामींची यादवबाबांवर कृपादृष्टी :

सद्‌गुरु केशवचैतन्य महाराजांच्या चमत्कारांची कीर्ती सर्वत्र पसरली होती. निरनिराळ्या ठिकाणाहून स्वामींच्या दर्शनासाठी लोक येत होते. गावातील भक्त मंडळींही नित्यनेमाने स्वामींच्या दर्शनाला जात असत. उत्तमापूर नगरीतच स्वामींचा एक यादवबाबा नावाचा ब्रह्मचारी भक्त राहत होता. तो रामदासी होता. तो सदाचार संपन्न असून रामाचे बाबतीत त्याचे मनात नितांत श्रद्धा होती. परंतु श्रद्धेला तत्त्वज्ञानाची जोड नसल्याने परमेश्वराबद्दल तळमळ व्यर्थ होती. चैतन्यस्वामींनी तुकारामास प्रत्यक्ष तत्त्वज्ञान सांगितले. हे ऐकून त्यास परमानंद झाला व तोही समाधीजवळ बसून तप करू लागला. त्याने अन्नपाणी वर्ज्य केले व स्वामींनी माझ्यावर कृपा करावी व अनुग्रह करावा अशी प्रार्थना तो करू लागला. त्याने सर्वांगास भस्म विलेपन केले. अंगावरील सर्व वस्त्रे फेकून दिली व अनुष्ठानास बसला. असे एक वर्षभर समाधीजवळ देवळात बसून त्याने कठीण तप आचरले.

मग एके दिवशी रात्री स्वामी त्याच्या स्वप्नात आले व त्यांनी त्याला सांगितले की, 'माझा तुला उपदेश होणार नाही तू येथून निघून जा.' तरी यादवबाबा तेथून जाण्याचे नाव घेईना. दुसऱ्या दिवशी चमत्कार झाला. स्वामींच्या समाधीजवळ खूप मुंगळे व भुंगे निघाले. त्यांनी यादवबाबांच्या शरीरावर कडाडून हल्ला चढविला. ते शरीरावरील मांस तोडू लागले. यादवबाबास खूप वेदना होऊ लागल्या. परंतु ते सर्व दुःख सहन करून ते तेथेच पडून राहिले. बेशुद्ध झाले. त्यांनी स्वामीवरील निष्ठा तीळमात्रही कमी होऊ दिली नाही. त्यांना रात्रीच्यावेळी कोणीतरी उचलून नदीत फेकून दिले. सकाळी ते शुद्धीवर आले व म्हणाले, 'पहा! मी स्वामींना आवडत नाही म्हणून मला येथे फेकून दिले गेले आहे. परंतु स्वामीवरील निष्ठेमुळे व प्रेमामुळे ते मोठ्या भक्तीभावाने लडखडत मोठ्या कष्टाने

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai
देवळात येऊन बसले व मोठ्याने रडून त्यांनी स्वामींचा धावा करण्यास सुरुवात केली. त्यांची ती भक्ती व कारुण्यपूर्ण किंकाळी ऐकून चैतन्यस्वामी घटनास्थळी प्रकट झाले व त्यांनी यादवबाबास दर्शन दिले व म्हणाले, 'मी तुझी परीक्षा पाहिली, तुझ्या ठिकाणी निष्ठा व धैर्य आहे किंवा नाही याचा तपास केला. हे वत्सा, तू माझ्या कसोटीस उतरला आहेस. मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे.'' नंतर त्यांनी त्याचेही मस्तकावर हस्त ठेवून त्यास उपदेश केला व आशीर्वाद दिला की, 'तुझी कीर्ती जगभर होईल. मग स्वामींनी त्याचे अंगावर तीर्थ शिंपडले. त्याबरोबर त्याचे शरीर दिव्य झाले. मग स्वामींचे दर्शन घेऊन व परवानगी घेऊन यादवबाबा घरी आले. सर्व लोकांना त्यांनी दर्शन दिले व गोरगरिब लोकांच्या सेवेत ते मग्न झाले. त्यामुळे त्यांचे नाव सर्वत्र दुमदुमू लागले.

●●●



Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

गुरु व सद्‌गुरु

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः !
गुरुः साक्षात परब्रह्म तस्मै श्रीगुरुवेनमः !!

'यथा देवे तथा गुरु' ज्ञानी मनुष्य ज्याप्रमाणे देवाची भक्ती करतो तशी सद्‌गुरूची करावी म्हणजे देव व सद्‌गुरु दोघामध्ये फरक नाही. देवाप्रमाणे गुरूला शरण जा.

'गुरु गोविंद दोनो खडे किसके लागूँ पाव?'' गुरु व देव दोघे समोर उभे आहेत. कोणाला आधी वंदन करावे? अगोदर गुरूला वंदन करावे असे सांगतात. कारण त्या सद्‌गुरूमुळे देवाची खरी प्राप्ती होते.

ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीत सांगितले आहे. 'गुरु हे क्षेत्र, गुरु हीच देवता, गुरु हेच माता, गुरु हेच पिता. तो गुरु पूजेपलिकडे दुसरा मार्ग जाणत नाही. श्रीगुरूचे दार हेच ज्याचे सर्वस्व सार आहे. असा तो गुरु सेवकांना सख्ख्या भावाचे प्रेमाने भजतो, ज्याचे मुख गुरुनामाचा मंत्र धारण करते व गुरु वाक्यावाचून दुसऱ्या शास्त्राला जो हात लावत नाही. ज्या कोणत्याही पाण्याला श्री गुरुचरणाचा स्पर्श झाला आहे त्या पाण्याला तीर्थ समजून त्रैलोक्यातील सर्व तीर्थे त्या पाण्यात आली आहेत असे समजतो. श्रीगुरु चालत असताना त्याच्या पायधुळीचे रजःकरण तो गुरुभक्त मोक्षसुखाच्या योग्यतेचे समजतो. गुरुवरील प्रेमाला अंत नाही.

खुद्द रामदास स्वामी म्हणतात, निष्कामता पूर्ण बाणलेला व आत्मबुद्धी दृढं असलेला पुरुष सद्‌गुरु होय. तोच संसाररूपी समुद्र उतरून नेईल. सद्‌गुरूचे मुख्य लक्षण हे आहे की त्याच्याजवळ प्रथम शुद्ध ज्ञान असते. तसेच आत्मविश्वासजन्य समाधान व अखंड स्वरूपकारताही असते. याशिवाय त्याचे वैराग्य कडकडीत असते. त्याची वृत्ती पूर्ण उदास व कामरहित असते. विशेषतः स्वधर्माचा आचार तो निर्मळपणे पाळतो.याखेरीज त्याच्याजवळ सद्‌गुरुसन्निध, अध्यात्मश्रवण,

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai
हरिकथानिरुपण, सगुणलीलांचे श्रवण व अध्यात्माचे विवरण म्हणजे परमार्थाचे विवरणच होत असते. त्याच्या ठिकाणी सारासार विचार चालतो. त्या ठिकाणी लोकांना उद्धाराचा मार्ग सापडतो आणि नवविधाभक्तीच्या योगाने बहुतजन उद्धरतात. म्हणून ज्या ठिकाणी नवविधाभजन असते व साधनमार्ग सांभाळला जातो तेच सद्‌गुरूचे लक्षण श्रोत्यांनी ओळखावे.

जो खरा सद्‌गुरु आहे तो केवळ सद्‌गुरु कृपेनेच लाभतो. कारण मानवी जीवनातील दुर्लभतम गोष्ट म्हणजे महापुरुषसंश्रय अर्थात सत्संग. सद्‌गुरु लाभणे ही भाग्याची गोष्ट आहे असे शंकराचार्यांनी सांगितले आहे.

आत्मज्ञानाचे डोळे आपल्याला कोण देतो? केवळ सद्‌गुरुच. बाकी कुणाचेही ते सामर्थ्य नाही. आत्मज्ञान, आत्मसाक्षात्कार आत्मप्रचिती सद्‌गुरुमुळेच मिळते.

सद्‌गुरूचे वैशिष्ट्य सांगताना ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, हा सद्‌गुरु सूर्यापेक्षा विशेष आहे. हा सद्‌गुरु स्वयंभू आहे. सूर्यालासुद्धा तेज कुणी प्रदान केलं आहे? ईश्वराने प्रदान केले आहे. हा सद्‌गुरु मात्र स्वयंभू आहे. त्यासाठी ज्ञानेश्वरमहाराजांनी सुंदर उदाहरण दिले आहे, ते म्हणतात, 'बाकी सर्व वृक्षांना मोहर यावा लागतो. मोहर आल्याशिवाय त्याला फूल किंवा फळं येत नाही. पण कल्पतरूला मात्र मोहर यावा लागत नाही. कल्पतरू आपोआप फळत असतो. आकाशाला मांडव घालावा लागत नाही. अमृताला पक्वान्ने सेवन करावी लागत नाही. कारण सूर्याचा प्रकाश स्वयंसिद्ध आहे. परमेश्वराने जरी त्याला प्रकाश दिलेला असला तरी सूर्य जगताचा आत्मा आहे. म्हणून त्याचा प्रकाश एका दृष्टीने स्वयंसिद्ध आहे. कापूराला दुसऱ्याकडे सुगंध मागावा लागत नाही. तो स्वयंसिद्ध आहे. क्षीरसागराला जसे दुसऱ्याकडे क्षीर किंवा दुग्ध मागावे लागत नाही तसा माझा सद्‌गुरु आत्मतृप्त आहे.

सद्‌गुरूची सेवा आपल्याला मनोभावे करावी लागते. त्याशिवाय पारमार्थिक सामर्थ्य आपल्याला प्राप्त होत नाही. माणसाची श्रद्धा, सद्‌गुरूंच्या चरणावर जितकी उत्कट तितका आत्मानुभव उत्कट.

गुरुचरणावर किती उत्कट भाव पाहिजे याबद्दल स्वामी दयानंदांची गोष्ट नेहमी सांगितली जाते. ती खरोखर श्रवणीय आहे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आर्य समाजाचे स्वामी दयानंद हे आपल्या देशातील फार दिव्य विभूति होऊन गेली. परब्रह्माचा साक्षात्कार करून घेण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य समर्पित केले. त्यांचे सद्‌गुरु स्वामी विरजानंद हे जन्मांध होते. परंतु आत्मज्ञानाला चक्षु नसले तरी चालतात, कारण आत्मज्ञानासाठी प्रज्ञा-चक्षुच लागतात.

विरजानंद अनुशासनात कठोर होते. शिस्तप्रिय होते. जन्मांध होते पण त्यांना सगळे कळत असे. स्वामी दयानंदांनी त्यांची अत्यंत मनोभावे शिष्य म्हणून सेवा केली होती.

भल्या पहाटे उठावे, मठ स्वच्छ करावा, आश्रम स्वच्छ करावा, गुरुजींची अपरंपार सेवा करावी, वाचावे, श्रवण करावे, पाठांतर करावे, लिहावे हा दिनक्रम होता दयानंदांचा! गुरूची वस्त्रे धुवावीत, आश्रमातला केरही काढावा, सगळा आश्रम लखलखीत करीत असत की विरजानंदांना आनंद होत असे. ते म्हणत असत, 'बघा रे! कसा माझा हा पुत्र आहे!' पुत्र म्हणत असत स्वामी दयानंदाला! पहा बरे! धुळीचा एक कण कुठे ठेवत नाही.'

एकदा विरजानंद आपल्या आश्रमामध्ये शतपावली करीत होते. चिंतन चालू होते ईशतत्त्वाचे, आत्मतत्त्वाचे! आणि कुठेतरी त्यांच्या पायाला केर लागला, कुठेतरी चुकून झाडताना स्वामी दयानंदांच्या हातून केराचे काही कण राहिले होते. त्यांनी हाक मारली, 'दयानंद इकडे ये', हाक मारल्याबरोबर दयानंद त्यांचे समोर येऊन उभे राहिले. विरजानंद त्यांना म्हणाले, 'ती कोपऱ्यातील काठी घेऊन ये', त्यांनी काठी सद्‌गुरूंच्या हाती दिली. म्हणाले, 'पाठ करून उभा रहा माझ्याकडे', दयानंद मुकाट्याने पाठ करून उभे राहिले. समाधान होईपर्यंत विरजानंदांनी त्यांना झोडपून काढले वर पुन्हा हातानीही मारले. हूँ का चूं केले नाही दयानंदांनी त्यावेळेला.

रात्र झाली, दयानंदाची पाठ सुजली होती. तरीही कण्हत नव्हते. का? कारण सद्‌गुरूंची झोपमोड होईल आणि केव्हा तरी एक हुंदका दयानंदाच्या मुखातून बाहेर पडला. विरजानंद योगी होते झोप काय नाममात्र! हुंदका ऐकल्यावर सद्‌गुरु उठून बसले. त्यांचे काळीज कळवळले. एकदम साद घातली. 'दयानंद!' दयानंद धावत आले आणि म्हणाले, 'आज्ञा सद्‌गुरु! त्याला विरजानंदांनी प्रेमाने जवळ घेतले आणि अक्षरशः अश्रुंनी न्हाऊ घातले. म्हणाले, 'अरे! मी चुकलो काय रे?' तुला

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai
इतके मारले, तेव्हा दयानंदांनी काय उत्तर द्यावे?

दयानंद रडले पण वेगळ्या कामासाठी रडले ते म्हणाले 'सद्गुरो!' तुम्ही मला मारले म्हणून मला वाईट वाटत नाही. मला वाईट वाटले ते वेगळ्या कारणासाठी. महाराज, मी लहानपणापासून कष्ट उपसल्याने माझे शरीर टणक झाले आहे. याची मला जाणीव आहे. आपण मला काठीने मारलेत आणि शेवटी हातानेही मारायला लागलात. मला वाईट अशासाठी वाटले की आपल्या कोमल हाताला उलट लागले असेल आणि म्हणून सद्गुरो! मला अत्यंत वाईट वाटले. हृदयात वेदना उमटली म्हणून नकळत हुंदका बाहेर पडला. असा उत्कट भाव किती शिष्यांच्या मनामध्ये असेल सांगा.

सद्गुरुविण ब्रह्मज्ञान । सर्वथा नव्हे जाण ।
सद्गुरुसेवा ते माझे भजन । गुरु आम्हा भिन्न भावो नाही ॥

मानवाला आत्मसाक्षात्काराप्रत नेणाऱ्या सर्व मार्गात सद्गुरूची नितांत आवश्यकता असते. किंबहुना परमार्थसाधनेत सद्गुरूला पर्यायच नाही. प्रत्येक मनुष्य हा भवरोगी असतो. सद्गुरु हे भवरोगाचे धन्वंतरी असतात. भवरोगाच्या उन्मादाने माणसे होरपळतात. द्वैतभावामुळे कडवट बोलतात. वासनारूपी अरण्यात भटकतात. विलासाच्या मदाने ते बेभान होतात. स्वानंदाचे शक्तीवर्धक देऊन सद्गुरु या भवरोग्याला पूर्णपणे रोगमुक्त करतो.

दुसरे असे की, ब्रह्मज्ञान वा आत्मज्ञानावाचून मुक्ती नाही व हे ब्रह्मज्ञान सद्गुरुवाचून होत नाही. सद्गुरूची आवश्यकता सांगताना अत्यंत सुंदर दृष्टांत दिले आहेत.

डोळ्याला चांगले दिसत आहे पण त्याला जर सूर्याचे वा प्रकाशाचे सहाय्य नसेल तर पुढे असलेला पदार्थ त्याला पहाता येणार नाही. नाव तारते. तीमध्ये मोठमोठे लोक बसले आहेत. परंतु त्या नावेत कोणी नावाडी असल्याशिवाय पैलतिरी जाता येणार नाही.

सद्गुरु हा गुरूहून वेगळा आहे. गुरु उदंड असतात. अवधूताचे चोवीस गुरु होते. शिष्यही अनेक प्रकारचे असतात. पण गुरुवचनावर पूर्ण विश्वास ठेवणारा शिष्य दुर्मिळ असतो. मधमाशीपासून आभाळापर्यंत प्रत्येक गोष्ट आपल्याला काहीना काही शिकवत असतात.

जो जो जयाचा घेतला गुण! तो तो म्या गुरु केला जाण!!
गुरूसी आले अपारपण! जग संपूर्ण गुरु दिसे !!

Digitization by Anna Samaj Charitable Foundation, Chennai
एकात्म ज्ञान देणारा एक सद्गुरुच असतो. परंतु आत्मज्ञान होईपर्यंत स्थूलरित्या अनेक गुरूंचे सहाय्य लागते. परमार्थाच्या वाटचालीत गुरुशिवाय मार्ग दिसत नाही.

संत तुकारामांना माघ शुद्ध दशमी, गुरुवार शके १५६१ दिनाक २३ जानेवारी १६४० या दिवशी गुरुकृपा लाभली. बाबाजी चैतन्य यांचेकडून 'रामकृष्णहरी' हा वारकरी संप्रदायाचा मूलमंत्र त्यांना लाभला. राघवचैतन्य, केशव चैतन्य, बाबाजी चैतन्य अशी परंपरा अभंगात सांगितली आहे. गंगास्नानाला तुकोबा निघाले असताना बाबाजी चैतन्यांनी आपला कृपाहस्त त्यांच्या मस्तकी ठेवून धन्य केले. ही गोष्ट ओतूर येथे घडली.

यानंतर **'यावरि या जाली कवित्वाची स्फूर्ति । पाय धरले चित्ती विठोबाचे ॥** (श्री तु. अ. गाथा १३३३) अशी अंतःस्फूर्ति झाली. तुकारामांचे ठायी मूळचा झरा होताच. सद्गुरुस्पर्शाने तो वाहू लागला. सद्गुरुरूपी परिसस्पर्शाने 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी । धरिता ही परी आवरेना ॥' अशी अवस्था त्यांना लाभली.

यांच्या आयुष्यात अवघड व कसोटीचे अनेक प्रसंग आले. प्रत्येक कसोटीत त्यांचे वैराग्याचे तेज हिऱ्याप्रमाणे झळाळून उठले. त्या तेजाने जग दिपून गेले. म्हणून त्यांना जगद्गुरु म्हणतात.

ज्ञानेश्वरमहाराज आपले श्रीमद्गुरु निवृत्तीनाथाबद्दल मोठ्या आदराने सांगतात-

मज हृदयी हा सद्गुरु । तेणे तारितो हा संसार पुरु
म्हणौनी विशेषे हा अत्यादरु । विवेकावरी ॥

श्री सद्गुरूचे स्थान माझ्या हृदयात अखंड आहे. त्यानेच या संसाररूपी पुरातून मला तारिले. त्याने माझ्या मनात विवेक स्थिर केला. त्या विवेकाविषयी मला नितांत आदर आहे.

कां चिंतामणि जालेया हाती । सदा विजयेपण मनोरथी ।
तैसा पूर्ण काम निवृत्ती । ज्ञानदेव म्हणे ॥

चिंतामणी हाती मिळाला तर सारे मनोरथ सिद्धीस जातात. त्याप्रमाणे श्रीमद्गुरु निवृत्तीनाथांच्या अनुग्रहामुळे मी तृप्त झालो आहे.

ब्रह्मविद्येची प्राप्ती सद्गुरुवाचून होत नाही. सद्गुरु हे खरे तर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai
ब्रह्मस्वरूपच असतात. पण शिष्यावर कृपा करण्यासाठी ते सगुण स्वरूप धारण करून मूर्तरूपाला येतात. सद्‌गुरु व ब्रह्मविद्या यांचे स्वरूप स्पष्ट करावयाचे झाल्यास अध्यात्म, विद्यारूपी सौभाग्यवतीच्या गळ्यातील अहेव तंतुप्रमाणे आहे. मंगळसूत्राप्रमाणे सद्‌गुरु आहेत. सद्‌गुरूचे महत्त्व दुसऱ्या प्रकारे सांगता येईल की, ज्याप्रमाणे बागेतील झाडांना माळ्याने हर प्रयत्ने करून त्यांची उत्तम जोपासना केली तरी वसंताच्या आगमनाशिवाय ती फुला-फळाला येणार नाहीत. तसे साधकाने कितीही प्रयत्न केला व उग्र तप करून ब्रह्मविद्येची प्राप्ती करून घेण्याचा प्रयत्न केला तरी सद्‌गुरुकृपारूपी वसंताचे आगमन झाल्याशिवाय त्याला ब्रह्मविद्यारूपी अमृत फळाची प्राप्ती होणार नाही.

आता उपाय वन वसंतु । जो आज्ञेचा अहेव तंतु ।
अमूर्तचि परिमूर्तु । कारुण्याचा ॥

जीव हा देहाशी तादात्म्य पावलेला असतो. भेदशून्य स्वात्मभावावरून त्याची नजर घसरल्यामुळे त्याला या जगताचा भास होऊ लागतो. पण ज्यावेळी जीव आत्मप्राप्तीचा प्रयत्न करू लागतो तेव्हा जशी नदीची धाव समुद्रापाशी थांबते, त्याप्रमाणे जीव-साधक, सद्‌गुरुपाशी आल्यावर स्थिर होतो. अशा प्रकारे सद्‌गुरु कृपा होऊन साधक-शिष्य हा ब्रह्मरूप होऊन गुरुपदाला येतो. अर्थात शिष्याचे शिष्यपण मावळते, लय पावते व त्या संदर्भात असले सद्‌गुरूचे गुरुपणही लय पावते.

शिष्यास ब्रह्मस्वरूपाचे जे ज्ञान होते ते केवळ गुरुकृपेमुळेच होते. त्यासाठी अन्य मार्गाचा आश्रय केला तर त्याचा उपयोग नाही. त्यासाठी श्रीगुरुकृपासंपादन करून आपले जीवन कृतार्थ करून घ्यावे लागते. हे श्रीगुरु संतुष्ट व्हावेत म्हणून त्यांची सेवा केली पाहिजे. ती सेवा कशी करावी याचेही मार्गदर्शन श्री ज्ञानेश्वरमहाराजांनी आपल्या आचरणातून व आपल्या ग्रंथातून व्यक्त केले आहे.

या सर्व उपासनेचे, सेवेचे फल त्या साधकाला काय प्राप्त होते? कारण कोणी कोणतीही उपासना करतो ती कोणत्या तरी फलाच्या अपेक्षेने करतो. फल प्राप्त व्हावे यासाठीच प्रत्येकाची धडपड चालू आहे. पण प्राप्त होणारे फल हे त्या त्या कर्मावर अवलंबून आहे. माणसाला कर्माचा विचार नको वाटतो, त्याला असे वाटते की आपण कोणतेही कर्म केले तरी त्याचे फल चांगलेच असावे. एका ठिकाणी असे म्हटले आहे की,

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पुण्यस्य फलमिच्छन्ति पुण्यं नेच्छिन्ति मानवाः ।
न पापफलमिच्छन्ति पापं कुर्वन्ति यत्नतः ॥

माणसे पुण्य करीत नाहीत पण पुण्यफलाची अपेक्षा ठेवतात आणि पाप करतात. पण पापाचे फल मात्र नको म्हणतात. असा सर्वसामान्य माणसाचा स्वभाव आहे. पण काहीही झाले, तरी मानवाला जे फल प्राप्त होते ते त्याच्याच कर्माचे फल असते. त्याच्या कर्माचे फल त्यालाच भोगावे लागते. ज्याप्रमाणे हजारो गायींच्या कळपामध्ये वासरू आपल्या मातेला शोधून काढते आणि तिच्याकडे जाते, त्याप्रमाणे कर्म पूर्वजन्मातील बरोबर त्याच्या कार्यालाच जाऊन भेटते. अन्यत्र जात नाही. प्रत्येक क्रियेचे फळ प्रत्येकास भोगावे लागते. जसे कर्म तसे त्याचे फल त्याला प्राप्त होतेच. परमार्थाचे उपाय केल्यानंतर त्याला मोक्षाचे फल प्राप्त होते. म्हणजे अन्य कोणतेही उपाय करण्याची आवश्यकता पडत नाही. कारण मोक्षप्राप्ती म्हणजे श्रीगुरूंची, परमात्म्याच्या स्वरूपाची प्राप्ती होणे । मोक्षानंतर काहीच नाही ही प्राप्तीदेखील श्रीगुरूंच्या कृपेनेच प्राप्त होते.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रकरण : ४

गुरुकृपा व कवित्वस्फूर्ती

आपण कोण गुरु करावा म्हणून तुकाराममहाराज पंढरपूरला पांडुरंगाला विचारावयास गेले. तेथे जाऊन पांडुरंगाला म्हणू लागले की, 'हे विठ्ठला तूच माझे मायबाप, भाऊ, तूच गुरु होऊन मला उपदेश कर व जन्ममरणाच्या फेऱ्यातून वाचव', मग परमेश्वर म्हणू लागले की, 'माझेच स्वरूप ओतूर येथे केशव चैतन्याचे रूपाने आहे. ते तुम्हास उपदेश करतील. तुम्ही त्यांस शरण जावे. मी राम अवताराचे वेळी वसिष्ठास गुरु केले, कृष्णावतारास सांदिपनींना गुरु केले. मी नामदेवासही विसोबा खेचरास शरण जाण्यास सांगितले.

पांडुरंगाने मार्गदर्शन केल्याप्रमाणे तुकाराममहाराज ओतूरला आले. बाजारपेठेत जानू तेल्याचे घरी बखळ जागेत राहिले. हा वेडा मनुष्य आहे म्हणून त्यांना कोणी राहण्यास जागा देईना. हा फक्त परमेश्वराचे चिंतन करतो, दुसरे भाषण काही एक करीत नाही. रात्री तेथे मुक्काम केल्यावर तुकाराम महाराजांचे स्वप्नात एक वृद्ध ब्राह्मण आला व एक पावशेर तूप भोजनासाठी मागू लागला. मग सकाळचे वेळी तुकाराममहाराज समाधीकडे जाऊ लागले त्यावेळी वाटेतच त्यांना स्वामी केशव चैतन्य भेटले. ते स्नानासाठी नदीवर चालले होते. त्यांना तुकारामाने साष्टांग नमस्कार केला आणि प्रार्थना केली की, 'महाराज मला उपदेश करावा.' तुकाराम एक अधिकारी व्यक्ती आहे म्हणून चैतन्य महाराजांनी त्यांचे मस्तकावर आशीर्वादपर हात ठेवला आणि काय आश्चर्य त्या पहाटेच्यासमयी त्या दोघांच्या मुखकमलावर एक क्षणभर एक लखलखीत प्रकाशझोत पडून निघून गेला. त्याचवेळी स्वामींनी त्यांना 'रामकृष्णहरी' हा आवडीचा मंत्र सांगितला. तुकारामांना पूर्ण ज्ञानी केले. जेथे मायेचा पडदा नाही ते स्वरूप दाखविले. तुकारामांना अतिशय आनंद झाला. नंतर तुकारामाने त्यांना गुरुपरंपरा विचारली. तेव्हा चैतन्य महाराजांनी सांगितले की, 'माझे नाव केशव चैतन्य, माझे गुरु राघव चैतन्य व त्यांचेही गुरु महर्षी व्यास आहेत. व्यासाला नारदाने उपदेश केला. नारदाचे गुरु ब्रह्मा व त्यांचेही गुरु श्री विष्णु आहेत.'' तेव्हा तुकारामाने त्यांना पूर्वाश्रमीचे नाव

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

विचारले तेव्हा स्वामी त्यांना म्हणाले की, "खरे पहाता पूर्वाश्रमीचे नाव सांगू नये, परंतु तुझ्याबद्दल प्रेम उत्पन्न झाल्याने सांगतो की, काशी क्षेत्रातील जे मुख्य दैवत 'विश्वनाथ' ते माझे नाव आहे. एवढे सांगून ते अदृश्य झाले. तुकाराम शुद्धीवर आले व आश्चर्य करू लागले. सद्गुरूने माझ्यावर कृपा केली पण माझ्याकडून त्यांची काहीएक सेवा घडू शकली नाही. मी पावशेर तूप देण्याचेही विसरून गेलो. स्वामींच्या समाधीनंतर सत्तावीस वर्षांनी म्हणजे शके १५२० विलंबनाम संवत्सरे माघ शुद्ध दशमी वार गुरुवार रोजी स्वामींनी तुकाराममहाराजांना उपदेश केला. महिपती म्हणतात, तुकाराम महाराजांना ओतूर येथे अनुग्रह झाल्यानंतर ते देहूला आले. सर्व सुखोपभोगांचा त्याग करून व इंद्रिय दमन करून एकनिष्ठेने ईश्वरभक्तीत पुढे मग्न झाले. गुरु उपदेश झाल्यानंतर पुढे दर एकादशीला ते वारीसाठी, गुरुदर्शनासाठी ओतूरला येऊ लागले.

गुरुकृपेवाचून रज-तम साफ धुवून जात नाहीत. आत्मज्ञानाच्या ठिकाणी दृढतम निष्ठा उत्पन्न होत नाही. ज्ञानाचा साक्षात्कार होत नाही. सर्व कमाई आपली असली तरी त्यावर श्रीगुरूच्या कृपेचे शिक्कामोर्तब व्हावे लागते. तेव्हाच ती कमाई भगवंतांचे दरबारी मान्य होते. निर्मळबुद्धीने ज्ञान प्राप्त झाले तरी ज्याप्रमाणे तेलाच्या दिव्याच्या पोटी काजळी त्याप्रमाणे ज्ञानाच्या पोटी अहंकार असतो. तो घालविण्यासाठी सद्गुरूची जरूरी असते. म्हणून 'यथा देवे तथा गुरु' म्हणजे देवाप्रमाणे गुरूला शरण जा. 'आचार्यवान पुरुषो वेद' म्हणजे आत्मवेत्या महापुरुषाचे पाय धरा असे वेद सांगतात. ज्ञानोबाराय व नाथ यांनी गुरुभक्तीची अपार माधुरी लुटली. ज्ञानेश्वर व नाथांनी श्रीगुरुमूर्तीतच पांडुरंग पाहिला तर तुकोबांनी पांडुरंगात श्रीगुरु पाहिले. गुरु साक्षात् ब्रह्म आहे व ब्रह्म गुरूच्या सगुण रूपाने कृतार्थ करते. स्वामी विवेकानंद, रामतीर्थ यांनी गुरुविषयी आपल्या भक्तीयोगात लिहिले आहे. सद्गुरु डोळ्यात ज्ञानांजन घालून शिष्याला डोळस करतात.

सद्गुरु म्हणजे मनुष्यरूपाने पृथ्वीतलावर प्रकट झालेले साक्षात नारायण. मुमुक्षुला गुरु धुंडावे लागत नाहीत. गुरूच कृतार्थ होण्यास कोण जीव पात्र आहेत हे पृथ्वीतलावर धुंडीत असतात. तुकाराम महाराजांचे बाबतीत नेमकी हीच घटना घडली आहे. तुकाराममहाराज म्हणतात-

मानियेला स्वप्नी गुरूचा उपदेश ! धरिला विश्वास दृढमात्री ॥
यावरी जाली कवित्वाची स्फूर्ती । पाय धरले चित्ती विठोबाचे ॥

●●●

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

गुरुकृपेचे अभंग :

(१) तुकोबावर सद्गुरु कृपा :

देवांनी बाबाजी उर्फ केशव चैतन्याचे रूप धरून स्वामीस स्वप्नामध्ये उपदेश केला तो अभंग-

सत्य गुरु रायें कृपा मज केली । परि नाही घडली सेवा काही ॥१॥
सांपडविले वाटे जाता गंगास्नाना । मस्तकी तो जाणा ठेविला कर ॥२॥
भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजी ॥३॥
काही कळे उपजला अंतराय । म्हणोनिया काय त्वरा झाली ॥४॥
राघव चैतन्य, केशव चैतन्य । सांगितली खूण मालिकेची ॥५॥
बाबाजी आपुले सांगितले नाम । मंत्र दिला राम कृष्ण हरी ॥६॥
माघ शुद्ध दशमी पाहून गुरुवार । केला अंगिकार तुका म्हणे ॥७॥

(२) माझिये मनीचा जाणोनिया भाव । तो करी उपाव गुरु रावो ॥१॥
आवडीचा मंत्र सांगितला सोपा । जेणे नोव्हे गुंफा काही कोठे ॥२॥
जाती पुढे एक उतरले पार । हा भवसार साधु संत ॥३॥
जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी । उतार सांगडी तापे पेटी ॥४॥
तुका म्हणे मज दावियेला तारू । कृपेचा सागरू पांडुरंग ॥५॥

(३) घालूनिया भार राहिलो निश्चिंती । निरविले संती विठोबासी ॥
लावूनिया हातें कुरवाळिला माथा । सांगितले चिंता न करावी ॥
सांगितला मंत्र रामकृष्ण साचा । सर्व काळ वाचा हेचि बोले ॥
कटी कर सम चरण साजिरे । राहिला भिवरे उभा ॥
खुंटले सायास आणीक या जी । धरिले केशवा पाय तुझे ॥
तुज वाटे आता ते करी अनंता । तुका म्हणे संता लाज माझी ॥

●●●



कपार्दिकेश्वराचे पुरातन मंदिर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

संत शिरोमणी तुकोबारायांची गुरुपरंपरा

बहिणाबाई व निळोबाराय हे दोघेही तुकोबारायांचे शिष्य. त्यांनी ही तुकोबारायांची गुरुपरंपरा दिली आहे.

निळोबारायांची गुरुपरंपरा

मुख्य महाविष्णु चैतन्याचे मूळ । सांप्रदाय फळ तेथोनिया ॥१॥
हंसरूपी ब्रह्मा उपदेशी श्रीहरी । चतुःश्लोकी चारी भागवत ॥२॥
ते गुज विधाता सांगे नारदासी । नारदे व्यासासी उपदेशिले ॥३॥
राघवचैतन्ये केले अनुष्ठान । त्यासी द्वैपायने कृपा केली ॥४॥
कृपा करूनि हस्त ठेवियेला शिरी । बोध तो अंतरी ठसावला ॥५॥
राघवाचरणी केशव चरण । बाबाजीसी पूर्ण कृपा त्याची ॥६॥
बाबाजीने स्वप्नी येऊन तुकयाला । अनुग्रह दिला निजप्रीती ॥७॥
जगद्गुरु तुका अवतार नामयाचा । संप्रदाय सकळांचा तेथोनिया ॥८॥
निळा म्हणे मज उपदेश केला । संप्रदाय दिला सकळजना ॥९॥

निळोबारायांची गुरुपरंपरा

महाविष्णु
|
हंस (ब्रह्मा)
|
नारद
|
व्यास
|
राघवचैतन्य
|
केशवचैतन्य
|
बाबाजी चैतन्य (विश्वनाथ)
|
तुकोबाराय
|
निळोबाराय

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

बहिणाबाईची गुरुपरंपरा

आदिनाथे उपदेश पार्वतीसि केला । मच्छिंद्रे ऐकिला मच्छगर्भी ॥१॥
शिवहृदयीचा मंत्र पै अगाध । झालासे प्रसिद्ध भक्तियोगे ॥२॥
त्याने त्या गोरक्षा केले कृपादान । प्रगट तेथोनि गहिनीप्रती ॥३॥
गहीनीने दया केली निवृत्तीनाथा । बाळपण असता योगरूप ॥४॥
तेथोनि ज्ञानेश पावले प्रसाद । झाले ते प्रसिद्ध सिद्धासनी ॥५॥
सच्चिदानंद बाबा भक्तीचा आगर । त्यासि अभयवर ज्ञाने केला ॥६॥
पुढे विश्वंभर शिवरूप सुंदर । तिणे राघवी विचार ठेविलासे ॥७॥
केशव चैतन्य बाबाजी चैतन्य । झालेसे प्रसन्न तुकोबासी ॥८॥
एकनिष्ठभाव तुकोबाचे चरणी । म्हणोनि बहेणि लाधलीसे ॥९॥

बहिणाबाईची गुरुपरंपरा

आदिनाथ

पार्वती

मच्छिंद्रनाथ

गोरक्षनाथ

गहिनीनाथ

निवृत्तीनाथ

ज्ञानेश्वर

सच्चिदानंद बाबा

विश्वंभर

राघवचैतन्य

केशवचैतन्य

बाबाजी चैतन्य

तुकोबाराय

बहिणाबाई

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आजचे प्रगतिपथावरील ओतूर

ज्या ज्या ठिकाणी निसर्गात काही भव्य-दिव्य, नयनमनोहर अगर वैचित्यपूर्ण वा वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी आढळतात त्या त्या ठिकाणी आपल्या पूर्वजांनी मंदिरे, गुफा इत्यादि ऐतिहासिक वास्तू तयार करून ठेवल्या आहेत. अशा काही पवित्र ठिकाणी पूर्वी साधू-महात्म्यांचं वास्तव्य असल्याचंही आपणास आढळून येतं व हेच आमच्या भारतीय संस्कृतीचं वैशिष्ट्य आहे. पुण्या-मुंबईपासून अवघ्या शे-सव्वाशे कि. मी. अंतरावर आमचं जुन्नर तालुक्यातील मांडवी नदीच्या किनारी वसलेलं एक पुरातन परंतु प्रेक्षणीय ओतूर हे गाव.



Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जुन्नर तालुक्याच्या पश्चिमेला सह्याद्रि पर्वताची भलीभक्कम उंचच उंच भिंत दक्षिणोत्तर पसरलेली असून तिचा एक फाटा पूर्वेला गेला आहे. हा फाटा म्हणजेच हरिश्चंद्र डोंगर श्रेणी होय. या श्रेणीमध्येच मांडवी नदीचा उगम आहे. या भागात नैर्ऋत्य मोसमी वाऱ्याचा भरपूर पाऊस पडतो. कृष्णा खोऱ्यातील मांडवी ही उत्तरेकडील शेवटची नदी होय. मांडवी नदीच्या उत्तरेकडे गोदावरी नदीचे खोरे सुरू होते. मांडवी नदीवर चिल्हेवाडी येथे मोठे धरण बांधले आहे. मांडवी नदीच्या उगमाकडील भागात घनदाट जंगल असून या ठिकाणी महादेवकोळी, ठाकर या आदिवासी लोकांची वस्ती आहे. या जंगलात साग, अंजन, कांचन, हिरडा, बेहडा, जांभूळ, उंबर, आवळा, मोह इत्यादी वृक्ष आढळतात. तसेच वाघ, माकडे, ससे, खारी, साप इत्यादी वन्य प्राणी आढळतात.

ओतूर हे एक ऐतिहासिक गाव असून त्याच्या काही खाणाखुणा आपणास अद्यापही आढळून येतात. ओतूरच्या सभोवती पूर्वीच्या काळी भक्कम तटबंदी होती. त्याचप्रमाणे तीन भक्कम वेशी होत्या. आजही दिमाखाने त्या उभ्या असलेल्या आढळतात. गावातील सरदारासारख्या अधिकाऱ्याला राहण्यासाठी गढी होती. गढीचे भग्नावशेष आजही आपणास आढळून येतात.

ओतूर या गावाच्या नावाची व्युत्पत्ती अमरकोशातील श्लोकाच्या आधारे पुढीलप्रमाणे सांगितली जाते.

नवनीतमयं लिंग येन केनापि कल्पितम् ।

हन्त तस्य प्रमादेन ओतुना भक्षितो शिवः ॥

(अमरकोश)

(अर्थ – कोणी तरी कल्पनेने लोण्याचं लिंग (शिवाची पिंड) केली. परंतु अरे रे ! त्याच्या घोडचुकीमुळे मांजराने ते लिंग खाऊन टाकले.) येथे ओतुः म्हणजे मांजर व विसर्गाचा र होऊन ओतूर शब्द झाला असावा. कारण मांजराला संस्कृतमध्ये पुढील शब्द आढळतात. ओतुर्बिडालो मार्जार.

तर काहींच्या मते वतूर, वोतूर, उत्तमापूर ही पूर्वीची नावे असून त्यापासून ओतूर हे नाव रूढ झाले असावे. मांडवी नदीच्या डाव्या तिरावर हे पुरातन गाव वसले आहे. गावापासून उत्तरेकडे दीड-दोन कि. मी. अंतरावर मांडवी नदीच्या डाव्या तिरावर, निसर्गरम्य ठिकाणी तुकाराम महाराजांचे गुरु बाबाजी उर्फ केशव चैतन्यांची संजीवन समाधी आहे. संत

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai
तुकाराम महाराजांचे व जवळच कपर्दिकेश्वराचे पुरातन मंदिर असून श्रावण महिन्यात दर सोमवारी येथे मोठी यात्रा भरते. येथील तांदळाच्या पिंडी प्रेक्षणीय असून त्यांचे वैशिष्ट्य पहाण्यासाठी महाराष्ट्रातून अनेक भाविक येथे यात्रेच्या काळात येतात. त्याच वेळी येथे कुस्त्यांचा जंगी आखाडाही भरतो. येथील आखाडा म्हणजे मल्लांची आव्हान भूमी आहे. ओतूर गावाजवळून औरंगाबाद-कल्याण-मुंबई हा राज्य महामार्ग माळशेज घाटातून जातो. त्यामुळे ओतूरला व्यापारीदृष्ट्या अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

शिवरायांच्या जन्माने व संतांच्या पदस्पर्शाने ओतूरचा परिसर पावन झालेला आहे. ओतूरच्या परिसरात अत्याधुनिक पद्धतीचा अवलंब करून व्यापारी शेती केली जाते. त्यामुळे हा परिसर शेती पिकदिण्यात महाराष्ट्रात अग्रेसर आहे. या भागात ऊस, केळी, द्राक्षे, टोमॅटो, कांदा, भुईमूग ही व्यापारी पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात. तसेच भाजीपाला, फळभाज्या पिकविण्याच्या बाबतीतही हा भाग प्रसिद्ध आहे. या भागात विविध प्रकारच्या रंगीबेरंगी व सुवासिक फुलांची लागवड वर्षभर केली जाते. दुग्धोत्पादन व पशुपालनही या भागात आधुनिक पद्धतीने केले जाते. येथील फळफळावळ, भाजीपाला, फुले यांना विदेशातून मागणी असते.

पुणे-मुंबईसारखी शहरे या परिसरातील लोकांना जवळ असल्याने व पुष्कळशी माणसे व्यापार व नोकरीधंद्याच्या निमित्ताने शहरात स्थायिक झाल्याने ओतूरला ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, परंपरा लाभल्या आहेत व त्यांचा एक सांस्कृतिक वारसा येथील मुलामाणसांना लाभला आहे. त्याचे प्रतिबिंब येथील रहिवाशांच्या बोलण्या-चालण्यातून, वागणुकीतून व आदरातिथ्यातून सहजपणे दृष्टीगोचर होते. संत तुकाराम महाराजांचे गुरु बाबाजी चैतन्यमहाराज यांच्या समाधीच्या निमित्ताने ओतूरवासीयांना अखंड गुरुपदाचा वारसा मिळाला आहे. आजही ती परंपरा खंडीत झाली नाही. स्वामींच्या कृपाप्रसादाने व आशीर्वादाने शिक्षणाच्या सर्व सुखसोयी येथे उपलब्ध झाल्या आहेत.

ऊस, केळी, द्राक्षे यांच्या हिरव्यागार बागा, फळाफुलांनी गच्च भरलेली शेते, कारली, दोडके, तोंडली, भोपळे यांचे सुंदर मांडव तांबड्या-हिरव्या गोल फळांनी लगडलेली टोमॅटोचो शेते, गहू-हरभऱ्याची वाऱ्यावर डुलणारी पिके, स्वच्छंदपणे कलकल आवाज करीत वाहणारे ओढे-नाले, पशु-पक्षी आपण स्वामींच्या दर्शनाला याल त्या वेळी नक्कीच तुमचे स्वागत करतील व तुम्हासही चैतन्य स्वामींच्या आशीर्वादाने सुख-शांती मिळेल यात शंका घेण्याचे कारण नाही. ● ● ●

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

चैतन्य स्वामींच्या संदर्भातील ऐतिहासिक कागदपत्रे

चैतन्य स्वामींच्या संदर्भातील ऐतिहासिक कागदपत्रे

काही वर्षांपूर्वी केशव चैतन्य उर्फ विश्वनाथ भट बाबा यांच्या वंशजापैकी ह. भ. प. नारायण आत्माराम राजर्षि इनामदार ओतूर यांनी केशव चैतन्यासंबंधी काही कागद गं. ना. मुजुमदार यांना दिले. त्यापैकी कारणापुरते चार कागदाविषयी माहिती भारत इतिहास संशोधन मंडळाचे त्रैमासिक वर्ष २रे यामध्ये त्यांनी छापली आहे. एवढेच ऐतिहासिक महत्त्वाचे पुरावे या संबंधात आपणास मिळतात ते पुढीलप्रमाणे :

लेखांक १ : मु.॥ सन इहिदे सबैन व तिसा मया ९७१ शके (१४९३) या वर्षी केशव चैतन्य यांनी समाधी घेतली म्हणून त्यांच्या नावे सन सबा सीतैन व तिसामया या वर्षापासून बुऱ्हाण निजामशहा यांनी दिलेली इनाम जमीन व झाडे चालत आलेली आपले नावे पुढे चालू करावीत म्हणून विश्वनाथ भट बाबाचे पुत्र व नातू नरसिंह भट बिन विश्वनाथ भट व केशवभट बिन नरसिंह भट या दोघांनी विनंती केल्यावरून त्यांचे नावे सदर जमीन व झाडे चालू करण्याबद्दल सनद सनदेचे वर्ष मु. ॥ सन इसंने सबैन व तिसा मया ९७२ (शके १४९०-९४) आहे.

लेखांक २ : मु. ॥ सन इसंने सबैन ९७२ पासून तो सु॥ सन ९९१ इहिदे तिसैन व तिसा मया या वर्षा पावेतो आपल्या नावे सदर इनाम जमीन व झाडे असलेली मु॥ सन इसंने तिसैन ९९२ या वर्षी अनामत केलेली पुन्हा चालू करण्याबद्दल वरील दोघां इसमांच्या नावे मु॥ सन सलास तिसैन ९९३ या वर्षाची सनद आहे. या सनदेतहि केशवचैतन्यांनी मु॥ सन इहिदे सबैन ९७१ या साली समाधी घेतल्याबद्दल स्पष्ट उल्लेख आहे.

लेखांक ३ : केशव चैतन्यांच्या मठास नदीमुळे धक्का लागला. त्यामुळे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai
नदी बांधून काढण्याकरिता शाहुमहाराजांनी रुपये १००० खर्चासाठी मंजूर केलेले आहेत. यात श्री (केशव चैतन्य) संन्यासी असा स्पष्ट उल्लेख आहे. यावरून केशव चैतन्य हे संन्यस्त होते हे उघड आहे.

लेखांक ४ : यात नरसिंह भट बिन विश्वनाथ भट हे अतिवृद्ध झाल्यामुळे व केशवभट बिन नरसिंह भट हे मु॥सन सबा अलपा १००७ (शके १५२८/२९) मध्ये मयत झाल्यामुळे मुकुंद भट व काशीभट यांच्या नावे सनद इनाम जमीन व झाडे चालविण्याबद्दल आहे म्हणजे केशव चैतन्याचा नातु व नरसिंहभटाचा पुत्र केशवभट चैतन्य हा शके १५२८/२९ पावेतो हयात होता.

वरील चार लेखांवरून व इतर गोष्टीवरून पुढील अनुमाने निघतात ती पुढीलप्रमाणे सादर करीत आहे.

१) केशव चैतन्याचे दीक्षा घेण्यापूर्वीचे नाव विश्वनाथभट होते असे त्यांनी संन्यस्त समाधि घेतल्यानंतर त्यांच्या पुत्राच्या (नरसिंह बिन विश्वनाथ भट) नावे केशव चैतन्याकडे चालत असलेले इनाम. जमीन झाडे व रोजमरा नेमणूक वगैरे चालू केलेले आहे या गोष्टीवरून स्पष्ट होते. केशव चैतन्याचे पुत्र नरसिंह भट अथवा नातू केशवभट असा उल्लेख सदर दोघा इसमांच्या नावामागे नसून तो केशवचैतन्याचे खिजमतदार अथवा विद्यार्थी असा आहे. याचे कारण संन्याशाचा पुत्र अथवा नातू म्हणून लिहिता येईना परंतु पुत्राचे संबंध नाव लिहिलेले असल्यामुळे केशव चैतन्याचे मूळचे नाव आपणास समजून येते.

२) सदर विश्वनाथ भट यांचे टोपण नाव बाबा होते. अशी माहिती त्याच्या वंशजात परंपरेने चालत आलेली आहे व निरंजनकृत चैतन्य विजयातहि असाच उल्लेख आहे.

३) एखाद्यास दीक्षा दिल्यानंतर त्यास काही तरी नाव देऊन त्या नावापुढे संप्रदायदर्शक नाव लावतात असे दिसते. असे असताना दीक्षा दिल्यानंतर संप्रदायदर्शक नावापूर्वी दादा, भाऊ, काका, मामा, बाबा अशा प्रकारचे नावे ठेवणे फारच अशक्य दिसते. केशव चैतन्याचा शिष्य बाबाजी चैतन्य असे जरी गृहीत धरले तरी केशव चैतन्याने आपल्या शिष्याचे नाव राघव चैतन्य, केशव चैतन्य अशी नामपरंपरा चालत आली असताना सुद्धा अगोदर देवाचे नाव ठेवून नंतर आपल्या संप्रदायाचे दर्शक 'चैतन्य' नाव त्यास जोडले असते.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

४) तुकारामांनी जेथे जेथे आपल्या गुरुनामाचा उल्लेख केलेला आहे. तेथे तेथे ते बाबाजी चैतन्य असा उल्लेख मुळीच करीत नसून फक्त बाबाजी असाच करीत आहेत.

गं. ना. मुजुमदार लेखांक १

फारशी शिक्का

(फारशी मजकूर)

अज दिवाण रख्तखाने खास बजानेबू हुदेदारानी व खोतानि हाल व इस्तकबाल व मोकदमानि व स्थान कसबे वोतूर समत जुनेर बिदानद मु।। सन इसने सबैन व तिसा मया नरसीभट बीन वीस्वनाथ व केशवभट बीन नरसीभट विद्यार्थी केशव चैतन्य माहानभावसोा कसबे मजकूर बंदगी हजरती मालूम केले जे जमीन चावर येक नजीक व झाडे मठाजवलीलकाा माा केशवचैतन्य माहानभाव यास व ।। हुजती राा हजरती मीरास्याहा बुऱ्हाणसाहेब इनाम आहे. केशव चैतन्य महानभाव जीत असता हा इनाम आपणास दुबाला आहे. आपण त्याचे विद्यार्थी मठी सेवा करीत आहो. आता तीही समाधी घेतली तरी आपले नावे हुजतीची रजा होये मालूम जाले ब ।। इसारती दीवाण आला. जमीन चावर येक व झाडे नजीकमठ दर सवाद कसबे मजकूर ब।। हुजती रा।। मीरासा बुऱ्हाण जैसे सन इहदे केसव चैतन्य माहानभावासी चालत आहेत. तैसेच अज इ।। मु।। सन इसने सालमजकूर पासुनु नरसीहभट बीन वीश्वनाथ भट व केशवभट बीन नरसीहभट विद्यार्थी केशवचैतन्य मजकूर यासी चालवीजे उजूर न कीजे दर हरसाल खुर्दखताचा उजूर न कीजे तालिक लिहून घेऊनु असेली भट मजकुरापासी असो दीजे मोर्तब खुद

रुजुसुद रुजुसुद रुजुसुद

सुरुनीस

तेरीख २० माहे रबिलाखर तीसा सबैन

××× असफ खान

×× सुटताली क×××

×× दफ्तरखान

बार सुद् बार सुद

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

बार सुद बार सुद

बार सुद

तालीक असेली

लेखांक : २

फारसी शिक्का

फारसी मजकूर

अज दिवाण रख्तखाने खास बजानेब कारकुनानी समत जुनर व मुकासाइयनी व हुदेदारानी हाल व इस्तकबाल व मोकदमानी कसबे उतूर समत मजकूर बिदानद शहूर सन सलाय तिसैन व तिसा मया नरसिंहभट व केशवभट विद्यार्थी केशव चैतन्य माहानभाव सेकिन कसबे उतूर बंदगी हजरती मालूम केले जे हर्ची जमीन चावर एक व झाडे नजीक मठ केशव चैतन्य दरसवाद कसबे मजकूर बरहुकुम हुजत हजरती मिराशाह बुऱ्हानसाहेब सबा सितैन कारकीर्दी हजरत बिबीसाहेब बिमान केशवचैतन्य दिधले होते. तेणेप्रमाणे तागायत इहिदे सबैन चालिलेयावरी केशवचैतन्य माहानभाव ही समाधी घेतली इसने सबैनी आपली नावे हुजती बसिके खास जाहाली आहे. तेणेप्रमाणे सालाबाद तागायत इहिदे तिसैन भोवरता तशृफात चालत आहे. सन इसने कारणे आमानत केले आहे इनामाचे बाबे परवानगी वर्क सादर आहे. जे कारकीर्दी हजरती बिबीसाहेब ब्राह्मण व हिंदू यासी इनाम असेत तो करार करणे चावर व झाडे नजीक मठ बाबत आमानत बर निसबत हुजती कदीम मोकदर करणे फर्मान मऱ्हामत होये मालूम जाहाले बरहुकुम इशारती आला बा । इलतनश देवविले. नरसिंहभट बिन विस्वनाथ भट व केशव भट बिन नरसिंहभट विद्यार्थी केशव चैतन्य माहानुभाव सेकिन उतूर यास इनाम जमीन चावर एक व झाडे नजीस मठ दर सवाद कसबे मजकूर बरहुकुम हुजत कदीम मोकरर केले असे तागायत इहिदे तिसैन जैसा भोगवटा तश्रुफात चालत असेल तेणे प्रमाणे दुबाला कीजे व आफलाद चालविजे दर हरसाल खुर्द खताची उजूर न कीजे तालिक लेहून घेऊन असल फिराऊन दीजे मोकरर ब।। परवानगी वर्क एकंदर ब्राह्मण व हिंदूसलास तिसैन छ २५ जिल्हेज सन आलफ बरहुकुम सवाद दफ्तरखास चावर एक तेरीख १८ माहे जमादिलावल.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

लेखांक : ३

केशव चैतन्य

स्वस्तिश्री राज्याभीषेक शके ३७ विकृति नाम संवत्सरे आषाढ शुद्ध शष्ठी सौम्यवासर क्षत्रियेकुलावंतस श्री राजाशाहू छत्रपती स्वामी यांन

मोकदमानी व सेटे माहाजनानी कसबे वोतूर प्राा हरिश्चंद यासी आज्ञा केलीऐसी जे श्री संन्यासी याचा मठ कसबे मजकुरी आहे त्यास नदीचा कडका लागोन जाया जाला आहे त्यास नदी बाधोन काढणे हे स्वामीस अगत्य याकरिता बाबतीचे ऐवजी दुसाला रुपये १००० येक हजार देविले आहेत व नंदी बाधावयाचे खटपटेस येक ब्राह्मण व येक अहुराप ठेवावयाविसी राजश्री पंतप्रधान यासी आज्ञा केली आहे. ते वतन नेमून देतील त्याप्रमाणे का । मजकूर पैकी देणे व व का। मजकूर पैकी गाडे व वेटे देऊन नंदी बाधोन काढणे मठास आजार न लागे ते करणे सदरहु हजार रुपये देऊन नंदी बांधवणे म्हणजे तुमचा मजुरा होईल गै केलिया स्वामी तुमचा मुलाहिजा धरणार नाहीत.

लेखनालकार – मर्या देय विरा जते



लेखांक ४ **फारसी शिक्का**

फारशी मजकूर

.... रख्त खास बजानेबु कारकुनानी व देशमुखानि जुनर .. वहुदेदारानी हाल व इस्तकबाल मुतालिक ... साई व अमानत व मोकदमान कसबे उतूर मामले मजकूर .. मुहुर सन समान अलफ भटानी जुजारदार वीद्या ... शव चैतन्य माहानुभाव सो। कसबे उतूर नफर २ बाप

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

... मालूम केले जे बीतपशील ... भट बीन नरसीहभट मालु .. काशीभट बीन केशवभट मालूम केले आपला वालिद नरसिंह भट .... वीस्व ... जे आपला वालीद केशवभट बीन नर ... नाथ भट खीहभट नाम जमीन चावर येक व झाडे नजीक मठ केशव चैतन्य दर ... कसबे उतूर मामले मजकूर ब।। हुजती बासीके खास कदीम ... कारर कारकीर्दी ब।। बुऱ्हाण वीजामस्या सन सलास तीसै ... कीर्दी ब।। बाहादूर निजामस्या सन सीत तिसैन आहे तेणे .. भोगवटा व तसरुफाती सालाबाद ताा सन सबा अलफ ... हे हाली नरसी भट बिन वीस्वनाथभट पिरीवक्त – केशवभट बीन नरसीहभट मयेती जाला आहे तरी आपली ... हुजती मऱ्हामती होये मालूम जाले ब।।। इशारती दीवाण .. इलतमेसी देवविले नरसीहभट बीन वीस्वनाथभट ... भट बीन नरसीह भट पिरीवक्त ... भट मयेती जाला आहे हाली यांचा इनाम यांचे फर्जद ... ल–भटफरजद नरसीहभट काशीभट फर्जंद केशवभट .. र केला आहे ता । सबा अलफ बीनाम नरसीहभट व केशसा भोगवटा व तसरुफाती चालीले असेली तेणेप्रमाणे ... लाकीजे औलाद व अफलाद चालवीत जाईजे दर हरसा ... खुर्दखताचा उजूर न कीजे तालीक घेऊन असली फी राऊनदी ... बसीके खास येकंदर इनामदारानी सन सबा अलफ ५ माहे रमजान झाडे नजीक मठ केशव चैतन्य जमीन चावर

●●●



Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आरत्या

ज्ञानदेवाची आरती

आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा ।
सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ॥ धृ. ॥
लोपले ज्ञान जगी । हित नेणवि कोणी ।
अवतार पांडुरंग । नाम ठेविले ज्ञानी ॥ १ ॥
कनकाचे ताटकरीं । उभ्या गोपिका नारी ।
नारदतुंबरही । सामगायनकरी ॥ २॥
प्रकट गुह्य बोले । विश्व ब्रह्मची केले ।
रामा जनार्दनी । पायी मस्तक ठेविले ॥ ३॥
आरती ज्ञानराजा ॥

श्री विठ्ठलाची आरती

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा ।
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥
पुंडलिकाचे भेटी पर ब्रह्म आलेगा ।
चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ॥१॥
जय देव जय देव जय पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा राईच्या वललभा पावे जीवलगा
तुळसी माळा गळा कर ठेवुनि कटी ।
कासे पितांबर कस्तुरी ल्लाटी ॥
देव सूरवर नित्य येती भेटी ।
गरुड हनुमंत पुढे उभे राहती ॥जय ॥२॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा ।
सुवर्णाची कमळे वनमाळा गळा ।
राई रखुमाबाई राणी या सकळा ।
ओवाळिती राजा विठोबासावळा ॥३॥
ओवाळू आरत्या कुर्वंड्या येती ।
चंद्रभागेमाजी सोडूनिया देती ।
दिंड्या पताका वैष्णव नाचती ।
पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥जय॥
आषाढी कार्तिकी भक्तजन येती ।
चंद्रभागेमाजी स्नान जे करिती ।
दर्शन हेळामात्रे तया होय मुक्ती ।
केशवासी नामदेव भावे ओवाळिती ॥जय॥

संत शिरोमणी तुकाराम महाराजांची आरती

आरती तुकारामा । स्वामी सद्‌गुरु धामा ।
सच्चिदानंद मूर्ति । पाय दाखवी आम्हा ॥१॥
आरती तुकारामा ॥धृ॥
राघवे सागरात । पाषाण तारिले ।
तैसे तुकोबाचे अभंग रक्षिले ॥२॥
आरती तुकारामा ॥धृ॥
तुकिता तुळनेसी । ब्रह्म तुकासी आले ।
म्हणोनि रामेश्वरे । चरणी मस्तक ठेविले ॥३॥
आरती तुकारामा ॥धृ॥

श्री बाबाजी चैतन्य स्वामींची आरती

श्री सद्‌गुरु बाबाजी केशव चैतन्य ।
भूलोकी भुवलोकी, सुरलोकी मान्य ॥
भक्तवत्सल नाही तुज ऐसा मान्य ।

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

भजनी ते पावति तुज होऊनिया धन्य ॥
शरण शरण तुज चैतन्य नाथा ।
भक्तकल्पद्रुम तू मोक्षदाता ॥१॥
जयदेव जयदेव चैतन्य नाथा ।
ओवाळू आरती पदि ठेवू माथ । हरली भवचिंता ॥धृ॥
राघव चैतन्यासी सुत ऐसा मान्य ।
तीर्थयात्रे केली भारतभू धन्य ॥
लावुनि भक्तिज्ञान-वैराग्य दीप ।
उत्तमापुरी, मांडवी तीरी आचरिले तप ॥
तारी भक्ता नेउनि निजानंद पंथा ।
लीलेने भरली चैतन्य गाथा ॥ जयदेव जयदेव ॥२॥
काशी विश्वेश्वर प्रसन्न झाले ।
गुरु-शिष्य पाहूनि डोलू लागले ॥
उत्तम ग्रामी केले पावन भक्ता ।
दासा सदनी बोलविली गंगामाता ॥
अणिमा-सिद्धीने समाधी घेता ।
पुष्पवृष्टी करिती देवता ॥ जयदेव जयदेव ॥३॥
संत शिरोमणि तुकया जगमान्य ।
प्रगटवुनी रूप तया केले धन्य ॥
'राम कृष्ण हरी' मंत्र देता त्यास ।
संत तुकया झाला केशवाचा दास ॥
ऐसा महिमा किती वर्णावा आता ।
भक्तांची माऊली भक्तांचा त्राता ।
जयदेव जयदेव ॥४॥
परब्रह्म सच्चिदानंद रूप ।
समाधीतहि भक्तिप्रेमे जागृत ॥
ऐसा कृपासिंधु ओहळासी भेटे ।
जन्मांतरिचे सुकृत सेवा घडविते ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पायापाशी ठेवा चैतन्यनाथा । जय विश्वनाथा ।
दास अनंत पूर्ण शरणागत आता ॥५॥
जयदेव जयदेव चैतन्य नाथा,
ओवाळू आरती पदि ठेवू माथा ।
हरली भवचिंता ॥

— चैतन्य दास

प्रार्थना

घालीन लोटांगण वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहिन रूप तुझे ॥
प्रेमे आलिंगिन आनंदे पूजिन ।
भावे ओवाळिन म्हणे नाम ॥१॥
त्वमेव माता च पिता त्वमेव ।
त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।
त्वमेव सर्व मम देव देव ॥२॥
कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा ।
बुद्धयात्मनावा प्रकृति स्वभावात् ।
करोमि यज्ञम् सकलं परस्मै ।
नारायणायेति समर्पयामि ॥३॥
अच्युतं केशवं रामनारायणं ।
कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम् ।
श्रीधरं माधवं गोपिका वल्लभं ।
जानकीनायकं रामचंद्र भजे ॥४॥
हरे राम हरे राम, राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण, हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ॥५॥

●●●

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



श्रावणातील सोमवारी कपार्दिकेश्वराच्या मंदिरातील तांदळाच्या पिंडी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

डॉ. जयकुमार मगर,
अध्यक्ष, भूगोल समिती,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ
मा. सदा डुंबरे संपादक, सा. सकाळ,
मा. शंकर वैद्य, सुप्रसिध्द कवी व लेखक,
प्रा. डिसोझा, प्राचार्य,
महिला महाविद्यालय कराड,
डॉ. अनिल अवचट,
सुप्रसिध्द लेखक व समाजसेवक,
सौ. उज्वला देसाई, भूगोल तज्ञ
इत्यादि मान्यवरांनी गौरवलेले व शाळा,
कॉलेज, शिक्षक, विद्यार्थी, पालक व
प्रवासी यांना उपयुक्त असलेले

कांगारूच्या संपन्न देशात

किंमत ८० रुपये

लेखक : प्रा. वामनराव ओतूरकर

या पुस्तकाची मागणी करा. शिक्षक व
शाळा, कॉलेजसाठी २५ टक्के कमिशन.
खालील पत्त्यावर पोस्टेजसह
फक्त ६५/- रूपये मनिऑर्डरने पाठवा.
किंवा वा. ब. ओतूरकर
या नावाने डिमांड ड्राफ्ट पाठवा.
पुस्तक रजि. पोस्टाने पाठविले जाईल.
चेक स्विकारले जाणार नाहीत.

प्रा. वा. ब. ओतूरकर
प्रतिभानगर, धनकवडी, पुणे - ४३.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हे ॥१॥

जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥२॥

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जें वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ॥३॥

वर्षत सकळमंगळी । ईश्वर निष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूतळीं । भेटतु या भूतां ॥४॥

चला कल्पतरुचे आरव । चेतना चिंतामणीचें गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥५॥

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥६॥

किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनिं तिही लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥७॥

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजये । होआवें जी ॥८॥

येथ म्हणे श्रीविश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥९॥